
|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||

NEW ENGLAND MARATHI MANDAL

ऑक्टोबर २०१९

शालिवाहन शके १९४१
विकारी संवत्सर

# अनुबंध




देशा देशांच्या सिमा वितळू दे
पणतीच्या प्रकाशांत
मनामनांतला अंगार जळू दे
अनारच्या कारंज्यात
अंतरीचा दीप तेवू दे
सतत या दिपावलीच्या तेजांत!

# अनुक्रमणिका


- **संपादकीय**
- **अनुबंध संपादक समिती**
- **कार्यकारिणी समिती**
- **मागोवा**
- **ललित लेख**
  - रोमन सम्राज्ञीचा सन्मान - देववाणी संस्कृतमध्ये - वैजयंती जोशी
  - एक आणि एकमेव लता दीदी - रजनी पवार
  - मु. पो. गुळसुंदे - श्रीराम घैसास
  - दिवाळी - विद्या भुतकर
- **कथा**
  - दाने दाने पर लिखा है - ज्योती जोशी
- **कविता**
  - अंतरीचे सूर - प्राची देशमुख
  - सोनपरी - भास्कर पवार
  - I am the one - प्रणिता देशमुख
  - वीर जवानांचा पोवाडा - सौ. मंजिरी परांजपे
  - चाहूल हेमंताची - विकास पाध्ये
- **कला**
  - रांगोळी - संगीता देशपांडे
- **पाककृती**
  - Exquisite Karanji Canapes - Indfused.com
  - मूग ओट्स धिरडं - प्रज्ञा गावडे
- **पर्यटन**
  - उन्हाळ्याची सुट्टी - मनीषा बिडकर
- **बालजगत** आणि **युवाविभाग**
  - चित्रकला - ऋजुता दीक्षित
  - चित्रकला - सेजल शिरोळे
  - शब्दकोडे - रोहिणी जोशी
  - कूट प्रश्न - शरयु जोशी
  - दिवाळीची धमाल - अर्णव जोशी
  - भूषणावह असे
    - अद्वैत नेने
    - अद्वय वाडेकर
    - अथर्व कासार
  - दिवाळी - राधा ओढेकर
  - Book Review - शमिका कानिटकर
- **आवाहन ( पुढचे लिखाण )**

# विशेष आभार


Always Going Above and Beyond...
Someone You Can Trust.
Buying and Selling your home can be a challenging and overwhelming experience. My personal attention to your transaction will ELIMINATE that stress. Allow me to help you with this important life event. I will walk you through the entire process step-by-step. Take advantage of my up-to-date market research and proven marketing techniques to get the best price. You can count on my local real estate and community knowledge, effective communication skills, and above all, my integrity as I negotiate your real estate deal.
There are NO fees for Buyer representation. My Buyer consultation services are FREE of cost. Call 978-257-6006 for an informal, no strings attached, free of cost consultation regarding your real estate needs. I am committed to getting the results you deserve. I won't just find you a house, I'll find you a HOME!
I have recently sold properties in Acton, Westford, Northborough, Chelmsford, Billerica, Medford, Ashland, Stoneham, and Lexington.
Buyer/Seller Consulation is Free!
Sangeeta Shere
Realtor®, Keller Williams Merrimack Valley
sangeetashere@kw.com
978-257-6006
kw MERRIMACK VALLEY
KELLERWILLIAMS. REALTY
Each Office is Independently Owned and Operated. Office: 978-692-3280

# संपादकीय

नमस्कार वाचक मित्रमैत्रिणींनो,

न्यू इंग्लंड मराठी मंडळ आणि अनुबंध च्या सर्व वाचकांना आणि सदस्यांना संपादकीय समिती तर्फे दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा .

दिवाळी म्हणजे दिव्यांचा, आनंदाचा, उत्साहाचा सण. मला हा सण माझ्या लहानपणीच्या आठवणींच्या दिवसात घेऊन जातो. नुकतीच संपलेली सहामाही परीक्षा, आईची फराळ बनवण्याची लगबग,दिवे - पणत्या आकाश कंदील याची तयारी तर दुसरीकडे अंगणात किल्लाची सजावट, आम्हा भावंडामधील फ़टाक्यांची वाटणी, नवीन कपडे आणि त्याला साजेसे दागिने, वसुबारसेला गाईच्या गोठ्यात जाऊन केलेली पूजा, नरकचतुर्दशीला केलेले यमदीप दर्शन, पहाटेच्या प्रकाशात आईने काढलेली आणि मी रंग भरलेली बारवाची/ कासव रांगोळी, ,लक्ष्मीपूजन, झेंडूची आरास ,आंब्याच्या पानांचे तोरण, लाह्या-बत्तास्याचा नेवैद्य, भरपूर उडवलेले फटाके, पाडव्याला केलेले दान, आणि भाऊबीजेला मिळालेली ओवाळणी, पाहुणे, घरोघरी दिले जाणारे फराळाचे ताट, रेडिओ वरील दिवाळीची खास प्रहसने, मग सुरु झालेली दिवाळी-पहाट ची रेलचेल या आणि अश्या अनेक आठवणी.

पण या सगळ्यांमध्ये खास लक्षात राहिलेले तें दिवाळी नंतर घरी येणारे दिवाळी अंक. दिवाळी अंक मग अगदी मुखपृष्ठापासून ते शेवटच्या पानापर्यंत त्याचे वाचन होत असे, विविध साहित्याची त्यात रेलचेल असे. लहान मुलं ची वेगळे अंक असे हि घरी येत असे . मला आज अनुबंधचा हा अंक आपल्या हाती देताना त्याचीच आठवण आली. खरे तर ठरवून असे दिवाळी साहित्यावरील अंक काढूया असे झाले नाही पण आपल्या लेखक मंडळींनी त्याला त्यांच्या साहित्याने दिवाळी अंकाचे स्वरूप दिले. रोमच्या संस्कृतीचा आणि संस्कृत भाषा यांचा एक मेळ घालणारा तर गानसाम्रादनी लता मंगेशकर यांचा ओळख करून देणारा एक विशेष लेख आहे. मु. पो. गुळसुंदे गावाकडील आठवणी तर प्रत्येकाला आपल्या वाटतील . कथा, कविता तरआहेतच; तसेच वीर जवानांचा पोवाडा वाचताना नक्कीच अंगावर रोमांच उभे राहतील. पर्यटन, बालजगत या सदारांबरोबरच आपल्या युथ ला नक्की कौतुकास्पद, स्फुर्तिदायक english मधील माहिती आहे. मंडळाच्या नवीन उपक्रमांतर्गत घेतलेल्या पाक कला स्पर्धेची विजेती रेसिपी तसेच दिवाळी निम्मित खास पदार्थाची रेसिपी नाडकर्णी,मॅसॅचूसेट्स मधील प्रसिद्ध शेफ यांच्याकडून आपल्याला भेट म्हणून देत आहोत. दिवाळीचा हा विशेष अंक प्रकाशित करताना मला आणि आमच्या संपादक समितीला अतिशय आनंद होत आहे.खात्री आहे कि आपल्या हि जरूर आवडेल.आम्हाला सुद्धा तुमचे अभिप्राय वाचायला आवडतील.

आम्हाला लाभलेल्या अनेक लेखकांचे मनापासून आभार कारण त्यानी आपल्या मंडळावरील प्रेम आणि आस्था, यावर विश्वास ठेवून त्यांचे लेख प्रकाशित देण्याची संधी दिली. दिवाळीच्या निमित्ताने संपादक म्हणून एकाच सांगावेसे वाटते कि डिजिटल अंक या माध्यमातुन आपण आपल्यातील परीघ वाढवूया. नवनवीन लेख आणि लेखक यांचा एक सुंदर मेळ घालूया आणि अनुबंध प्रत्येक घराघरात वाचला जाईल याची खात्री बाळगूया.

आपली,
सौ सीमा कानिटकर

# अनुबंध संपादक समिती

**संपादक :** सीमा कानिटकर

**संपादक सहाय्य :** मिलिंद कानिटकर
संतोष साळवी
प्राची देशमुख

**मांडणी व सजावट :** अमेय परांजपे

**जाहिरात सहाय्य :** रवी कुलकर्णी

**मुखपृष्ठ :** ज्योतीताई जोशी

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध मासिकात जाहिरात करण्यासाठी कृपया संपर्क करा:

सीमा कानिटकर (संपादक) - seema.kanitkar@nemm.org
रवी कुलकर्णी (वित्त) - ravi.kalkarni@nemm.org

***लेखांत व्यक्त झालेली मते ही पूर्णपणे संबंधित लेखकांची आहेत. न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळ तसेच संपादक समिती त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.
***अंकासाठी सर्व काळजी घेतली गेली असली तरी छपाईत किंवा अन्य इतरत्र काही चूक भूल झाली असल्यास उदार मनाने ती नजरेआड कराल अशी आशा आहे.

***अनुबंध मासिकामध्ये सुशोभीकरणासाठी वापरण्यात आलेली चित्रे ही माहिती अंतर्जालातून घेण्यात आलेली आहेत. त्यांचे मालकी हक्क संबंधित मालकांकडे असून न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळाकडे नाहीत.

# कार्यकारणी समिती (२०१९-२०)


संतोष साळवी


सुहास कासार


सीमा कानिटकर


रवी कुलकर्णी


अंजली माईणकर


अमेय परांजपे


अर्चना पानवलकर


बकुल कानडे


चंद्रकांत शिरोळे


चेतन विधाते


मिलिंद रानडे


संदीप आडगावकर


श्वेता साळवी


स्मिता लाटे


स्वाती शिंदे

# मागोवा

नमस्कार मंडळी, मागील काही महिन्यात मंडळाचे गुढी पाडवा, महाराष्ट्र दिन, पिकनिक तसेच गणपती उत्सव हे कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडले. याच कार्यक्रमाची काही क्षणचित्रे येथे  देत आहोत.














# ललित लेख

## रोमन सम्राज्ञीचा सन्मान - देववाणी संस्कृतमध्ये

२०१९ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मला 'दुग्धशर्करा योग' ह्या वाक्प्रचाराची पुन्हा एकदा सुखद प्रचिती आली. त्याचेअसे झाले की; आम्ही सह कुटुंब सह परिवार Europe भ्रमंतीचा घाट घातला. आमच्या भ्रमणाची सुरुवात रोम - 'The Eternal city' पासून झाली. मला स्वतःला रोम बद्दल खूप उत्सुकता होती. रोमन इतिहासाचे बऱ्यापैकी वाचन आधीपासून असल्यामुळे आणि त्यात guidebooks ची भर पडल्यामुळे, कधी एकदा 'Roman Forum' बघते असं झालं होतं.

'Roman Forum' हा रोम शहराच्या मध्यभागी असलेल्या एका मैदानात अनेक महत्वाच्या प्राचीन सरकारी इमारतींच्या अवशेषांनी वेढलेला आयताकृती मंच (प्लाझा) आहे. रोमन साम्राज्याचा हा एकेकाळचा दिल्लीदरबार होता असे म्हणायलाही हरकत नाही. रोमन सार्वजनिक सभा, न्यायालयें, ग्लॅडिएटोरिअल लढाया, आणि धार्मिक सोहळ्यांचे ते केंद्र होते. तेथील वेगवेगळी मंदिरे आणि स्मारके ह्यांचे अवशेष हें रोमन संस्कृतीच्या तत्कालीन प्रगल्भतेचे साक्षीदार म्हणून अजूनही उभे आहेत.

आमच्या गाईडने टूरची सुरुवातच Forum म्हणजे काय आणि त्या शब्दाच्या व्युत्पत्ती बद्दल सांगत केली. त्याचे म्हणणे होते की लॅटिन भाषेतील 'foris, foras "out of doors, outside,' ह्या शब्दांवरून Forum ह्या शब्दाची व्युत्पत्ती झाली आहे. door ह्या शब्दाची व्युत्पत्ती 'द्वार' ह्या संस्कृत शब्दावरून झाली आहे, हे मला माहिती होते. झाले, मग काय विचारता? माझे विचारचक्र सुरु झाले. संस्कृत, लॅटिन, ग्रीक आणि English ह्या भाषांच्या शब्दांमधील साम्य, PIE (Proto-Indo-European) ह्या भाषेच्या अस्तित्वाबद्दल असलेल्या रास्त शंका, AIT (Aryan Invasion Theory) मधील अगणित चुका, Hittites/Mittanis ह्या संस्कृतींवर असलेला संस्कृतचा पगडा, आमच्या नवीन पिढीचं स्वतःच्या भाषांबद्दल असलेलं औदासिन्य ह्या सगळ्याच विषयांवरच वाचलेलं साहित्य डोळ्यांसमोर तरळायला लागलं. शतकानुशतकांपूर्वी, संस्कृत भाषेचा रोमन साम्राज्यावर काय प्रभाव असेल अशा विचारांच्या तंद्रीत मी आमच्या जथ्थ्याबरोबर, कधीकाळी रोमन विजेत्यांचे लुटीने भरलेले रथ ज्या रस्त्यांवरून दौडत आले असतील त्याच 'Roman Forum' च्या रस्त्यांवरून चालू लागले.

माझेपाय गाईड च्या मागोमाग मला अजून एका स्मारकासमोर घेऊन आले आणि खरोखर माझे दोन आवडते छंद, इतिहास आणि भाषा, ह्यांचा 'दुग्धशर्क रा योग' मला 'ह्याची देही ह्याची डोळां' दिसला. मी एका पुरातन रोमन मंदिराच्या ('Temple of Antoninus and Faustina') भग्न अवशेषासमोर उभी होते. आमचा गाईड सगळ्यांना त्या भव्य वास्तूच्या 'Corinthian columns' बद्दल समजावून सांगत होता. ऊन्ह चांगलंच मी म्हणत होतं त्यामुळे मला त्या वास्तूच्या अगदी उंच टोकावर काय लिहिले आहे तें दिसेना. डोळे खूप बारीक करून जें दिसले त्याकडे बघून मी अवाकच झाले. तिथे लिहिलं होतं;

"**Divo** Antonino et **Divae** Faustinae Ex S.C".



मी आश्चर्यचकित होऊन हे नक्की कोण देव आणि देवी ययत ह्याचा विचार करू लागले. कारण मला divo (दिवो) / divae (दिवा) ह्या शब्दांनी संस्कृत विभक्त्याच आठवायला लागल्या.

| विभक्ति | एकवचन | द्विवचन | बहुवचन |
|---|---|---|---|
| प्रथमा | देवः | देवौ | देवाः |
| द्वितीया | देवम् | देवौ | देवान् |
| तृतीया | देवेन् | देवाभ्याम् | देवैः |
| चतुर्थी | देवाय | देवाभ्याम् | देवेभ्यः |
| पंचमी | देवात् | देवाभ्याम् | देवेभ्यः |
| षष्ठी | देवस्य | देवयोः | देवानाम् |
| सप्तमी | देवे | देवयोः | देवेषु |
| संबोधन | हे देव! | हे देवौ! | हे देवाः! |

गाईडची commentary पण आता columns वरून त्या शिलालेखापर्यंत पोहोचली होती. तो सांगत होता "सम्राट ऍन्टोनिओस पियस यांनी 141 A.D. मध्ये त्यांची मृत पत्नी, सम्राज्ञी फॉस्टीना द एलडर, यांना देवत्व प्रदान करून, हे मंदिर समर्पित केले होते. 161 A.D. मध्ये ऍन्टोनिओस पियसना, त्यांच्या मृत्यूनंतर, देवत्व प्रदान केले गेले. तेव्हा त्यांचे उत्तराधिकारी मार्कस ऑरिलिअस यांनी मंदिर ऍन्टोनिओस आणि फॉस्टीना ह्या दोघांना पुन्हा समर्पित केले." मला हे देवत्वं काही कळेना म्हणून मी गाईडला पुन्हा विचारल्यावर त्याने सांगितले, "रोमन साम्राज्यात सम्राट आणि सम्राटांचे वंशज ह्यांची demigods किंवा देवता म्हणून उपासना केली जात होती. एका सम्राटाला जर दिव्य व्यक्ती म्हणून घोषित केले तर त्याच्या वंशजांना पण प्रजेद्वारे विशेष धार्मिक महत्त्व दिले जात असे आणि ते राज्यप्रमुख/ प्रमुख धार्मिक व्यक्ती म्हणून काम करत असत. या व्यवस्थेमुळे सम्राट आणि त्यांचे वंशज निरंकुश पणे राज्य चालवू शकत असत. अशा दिव्य पुरुषाला देवो आणि दिव्य स्त्रीला दिवा असे म्हणत असत.

सम्राज्ञी फॉस्टीनाने अभिजातपणा, परंपरेचा आदर आणि विवाहित समतोल राखण्याचे कौशल्य असा आदर्श रोमन स्त्री गुणांचे प्रतिनिधित्व केले होते असे म्हणतात. सम्राज्ञी फॉस्टीना यांचा कार्यकाळ जरी थोडाच, तरी शांत आणि समृद्ध होता. त्यांच्या मृत्यूमुळे शोकग्रस्त आणि विचलित झालेल्या सम्राट ऍन्टोनिओस ने

महाराणींचा भव्य अंत्यसंस्कार करण्याची व्यवस्था केली आणि त्यांना "दिवा" किंवा देवी म्हणून दर्जा दिला. त्यांचे पोर्ट्रेट असलेली आणि "दिवा" असे लिहिलेली कोट्यावधी नाणी तयार करवली. या नाण्यांची इतकी मुबलकता होती की ही नाणी अजूनही उत्खननांत आणि बाजारात सहज सापडतात. नाण्यांवरील पुरावा असे दर्शवतो की सम्राज्ञी फॉस्टीनाने धर्मार्थ आणि रोमन गरीब लोकांसाठी बरेच कष्ट केले. एका नाण्यावर सम्राज्ञी फॉस्टीनाने गरीब रोमन कुटुंबातील मुलींच्या शिक्षणासाठी पैसे भरण्यासाठी उभारलेल्या एका फंडचा संदर्भ आहे.

सम्राज्ञी फॉस्टीनाच्या पूर्वीच्या किंवा नंतरच्या कोणत्याही रोमन महाराणीच्या देवत्वाला इतकी प्रसिद्धी आणि बढती दिली गेली नाही. त्यांचे पुतळे सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये नेहमी उभे केले जात असत. सम्राटांच्या शेजारी नाट्यगृहात सुद्धा महाराणींच्या पुतळा असायचा. हे पत्नी प्रेम खरे होते दिखावा होता हे कळण्यास आता मार्ग नाही पण अशा अत्यंत पत्नीभक्तीमुळे त्यांचा धार्मिक, कुटुंबप्रेमी आणि निष्ठावान असा बोलबाला होता, ज्याचा उपयोग त्यांना त्यांची प्रदीर्घ राजकीय कारकीर्द एक हाती ठेवण्यात झाला हे मात्र नक्की!

आजकाल आपण सेलिब्रिटी स्टेटस असलेल्या स्त्रियांना जे Diva म्हणतो तोच हा सम्राज्ञी फॉस्टीनाचे तथाकथित दैवी गुण रोमन साम्राज्यात सर्वदूर पसरविणारा DIVA शब्द आहे हे कळल्यावर आश्चर्य मात्र वाटलं नाही. इतक्या सामर्थ्यशाली रोमन साम्राज्याला स्वतःचे सम्राट आणि सम्राज्ञी यांचे दैविक गुणदान गाण्यासाठी संस्कृतसदृश्य शब्दांची मदत घ्यावी लागायची याचही आश्चर्य वाटलं नाही कारण बावनकशी सोन्याचे दागिने ल्यायलेल्या एखाद्या सौंदर्यवती सारखी किंवा त्यापेक्षा कणभर अधिकच सौंदर्य (भाषेचे) मिरवणारी आणि त्या सोन्यासारखी शुद्ध असणारी संस्कृत भाषा ही मुळातच देववाणी असल्यामुळे तिची मंत्रवत अक्षरे, अर्थमधुर शब्द आणि आजकालच्या सॉफ्टवेअर अल्गोरिदम ना लाजवेल असे सूत्रबद्ध व्याकरण या सर्वांपासूनच जगातील सर्व भाषांची उत्पत्ती झाली आहे ही माझी खात्री आहे!

ऋग्वेदातील, देवीसूक्तातील (ज्याला वाक्-सूक्तम् असेही म्हणतात) शेवटच्या श्लोकाने हा लेख पूण करते.

अहमेव वात इव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा ।
परो **दिवा** पर एना पृथिव्यैतावती महिना सं बभूव ॥10.125.08 (मंडल, सूक्त, रीक्)

मी वेगवान वाऱ्याप्रमाणे वाहुन, हेच विश्व गतिमान करते आणि सर्व सजीव प्राण्यांना एकत्रित करून ठेवते. मी माझ्या शौय, महानता आणि पराक्रमात इतकी महाकार्य आहे की मी स्वर्ग आणि पृथ्वीच्या पलीकडे आहे.

- वैजयंती जोशी

**Sources:**
https://www.etymonline.com/search?q=forum
https://web.cn.edu/kwheeler/IE_Main4_Sanskrit.html
https://www.khanacademy.org/humanities/world-history/world-history-beginnings/ancient-india/v/sanskrit-connections-to-english
https://en.wikipedia.org/wiki/Corinthian_order
http://www.vroma.org/~bmcmanus/faustinamaior.html
https://en.wikipedia.org/wiki/Deva_(Hinduism)

# एक आणि एकमेव लता दीदी

दिलीप चावरे



'भारतातील जास्तीत जास्त लोकांच्या हृदयावर राज्य करणारी एक व्यक्ती कोण?' असा प्रश्न विचारला तर एकच उत्तर येईल: लता मंगेशकर. लता दीदी नुकत्याच ९० वर्षांच्या झाल्या. मात्र त्यांच्या आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. किती आले आणि गेले, पण लता दीदी ध्रुव ताऱ्याप्रमाणे एकमेव अढळ आहेत.

लतादीदींनी १९४२ पासून गेल्या सात दशकांत मराठी, हिंदी आणि विविध भाषांमधील हजारो चित्रपटांची आणि इतर गाणी गायली आहेत. किमान २० प्रादेशिक भाषांमधूनही त्यांनी रसिक मनांवर अधिराज्य केलं आहे. त्यांनी गायलेल्या गाण्यांची संख्या २५ हजारांपेक्षाही सहज जास्त असेल. हा जागतिक विक्रम असून त्याची बरोबरी कधीही होण्याची शक्यता नाही.

लता दीदींचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्य प्रदेशातील इंदोर येथे झाला. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे मराठी संगीत नाट्यसृष्टीतले प्रसिद्ध गायक-नट होते. मंगेशकर कुटुंबीयांचं मूळ आडनाव हर्डीकर होतं. पण ते मूळचे गोव्यातील मंगेशी येथील असल्यानं त्यांनी मंगेशकर हे आडनाव लावण्यास सुरुवात केली. लता दीदींच्या आईचं नाव शुद्धमती. त्यांना सर्व जण माई म्हणत. लता हे ज्येष्ठ अपत्य. माई आणि दीनानाथ यांना लता, आशा, उषा, मीना या चार कन्या आणि हृदयनाथ ही पाच अपत्यं झाली. या प्रत्येकानं संगीत क्षेत्रात मोठी कामगिरी केली.

लता दीदींचे पहिले गुरू होते दीनानाथ. पाचव्या वर्षापासून दीदींनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल कलाकार म्हणून आपली कारकीर्द सुरु केली. लता अवघी तेरा वर्षांची असताना १९४२ साली दीनानाथांचं अचानक निधन झालं. घरची गरीबी होती. माई आणि आपली चार भावंडं यांचं पालनपोषण करण्याची जबाबदारी दीदींवर येऊन पडली. या काळात प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते मास्टर विनायक यांनी मंगेशकर परिवारावर मायेची पाखर घातली. त्यांनी दीदींना मराठी चित्रपटांत गाण्याची आणि

अभिनयाची संधी दिली. वसंत जोगळेकरांच्या `किती हसाल' या १९४२ सालच्या चित्रपटातले `नाचू या गडे, खेळू सारी मनी हौस भारी' हे सदाशिव नेवरेकरांनी संगीतबद्ध केलेलं गीत गाऊन त्यांनी आपल्या अलौकिक कारकिर्दीला सुरुवात केली. त्याच वर्षी दीदींनी भूमिका केलेला `पहिली मंगळागौर' हा चित्रपटही प्रदर्शित झाला. या चित्रपटास दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेलं होतं. त्यात एक गाणं छोट्या लतानं गायलं होतं. मास्टर विनायक यांच्याबरोबर मंगेशकर कुटुंबीयही १९४५ साली कोल्हापूर इथून मुंबईला आलं आणि लताचं अर्धवट राहिलेलं संगीत शिक्षण पुढे सुरू झालं. उस्ताद अमानत अली खाँ भेंडीबाजारवाले यांच्याकडून तिनं हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची तालीम घ्यायला सुरुवात केली. याच काळात तिचा हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश झाला. वसंत जोगळेकरांच्याच १९४६च्या `आप की सेवा में' या चित्रपटात संगीतकार दत्ता डावजेकर उर्फ डीडी यांनी संगीतबद्ध केलेलं `पा लागू कर जोरी' हे पहिलंवहिलं गीत दीदी गायल्या. दरम्यान दीदींनी संगीताची आराधना चालूच ठेवली होती. उस्ताद अमानत खाँ देवासवाले आणि पंडित तुलसीदास शर्मा यांच्याकडून दीदींनी नंतरची तालीम मिळवली.

त्या काळात हिंदी चित्रपट संगीत क्षेत्रात नूरजहाँ, शमशाद बेगम, सुरय्या, जोहराबाई अंबालावाली आणि मुबारक बेगम यांच्यासारख्या उर्दू मातृभाषा असलेल्या गायिकांच्या भरदार आवाजाची मोहिनी भारतीयांवर पडली होती. या वातावरणात मराठी भाषिक लता दीदींना हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळवणं आणि पाय रोवणं खडतर होतं. त्या काळातील निर्मात्यांना दीदींचा आवाज बारीक वाटला आणि या कारणास्तव काहींनी तो वापरण्यास नकारसुद्धा दिला होता. पण तेव्हाचे यशस्वी संगीतकार गुलाम हैदर यांनी दीदींच्या आवाजाची जादू जाणली होती. हैदर यांनी हाच आवाज राज्य करणार हे तेव्हाच ओळखलं आणि त्यांनी दीदींना 'मजबूर' (१९४८) या चित्रपटातलं `दिल मेरा तोडा' या पुढे अमर झालेल्या गाण्याची संधी दिली.

सुरुवातीला दीदी त्या काळातील नूरजहाँसारख्या गायिकांच्या आवाजाची नक्कल करीत असत. पण अनिल विश्वास यांच्या सांगण्यानुसार कालांतरानं दीदींनी स्वत:ची खास गायकी प्रस्थापित केली. आपले उर्दू उच्चार निर्दोष व्हावेत म्हणून अपार मेहनत केली. त्यासाठी शफी नावाच्या मौलवींकडून त्यांनी उर्दू उच्चारांचं रीतसर धडे गिरवले. शास्त्रीय संगीताची तालीम चालूच ठेवली. लता दीदींचं अमाप गाजलेलं पहिलं गाणं होतं १९४९ सालच्या `महल' चित्रपटातलं खेमचंद प्रकाश यांनी संगीतबद्ध केलेलं `आयेगा, आयेगा, आयेगा आनेवाला' हे गीत.

भारताची फाळणी झाली आणि लता दीदींचा उत्कर्ष सुरू झाला. त्या काळातील अनिल विश्वास, नौशाद, सज्जाद हुसेन, वसंत देसाई, हंसराज बहल, सी. रामचंद्र यांच्यासारखे गाजलेले आणि नावाला येणारे शंकर-जयकिशन, मदन मोहन, एस. डी. बर्मन, सलील चौधरी अशा संगीतकारांनी दीदीच पाहिजेत असा आग्रह धरणं सुरू केलं. आता दीदींच्या गाण्यांना प्रचंड लोकप्रियता मिळत गेली. त्या काळात लता दीदींनी गायलेल्या आणि गाजवलेल्या गाण्यांची यादी करायचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. परंतु कोणतं गाणं अधिक सरस असा पेच त्या प्रत्येकाला पडत गेला. ओ. पी. नय्यर हा एक अपवाद वगळता प्रत्येक संगीतकाराकडे दीदी गात होत्या.

संगीतकार सलील चौधरी यांनी `मधुमती' या चित्रपटासाठी संगीतबद्ध केलेल्या `आजा रे परदेसी' या गाण्यासाठी लता दीदींना पहिलंच फिल्मफेअर पारितोषिक मिळालं आणि त्या लोकप्रियतेच्या शिखरावर कायमस्वरूपी विराजमान झाल्या. त्यानंतर सतत त्यांचंच नाव पुढे येऊ लागल्यानं त्यांनीच हे पारितोषिक घेणं थांबविलं.

चीननं १९६२ साली भारतावर आक्रमण केलं. त्या युद्धात आपले शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी कवी प्रदीप यांनी एक खास गीत लिहिलं. त्यात शोक आणि राष्ट्रभक्ती यांचा अनोखा मिलाफ होता. सी. रामचंद्र यांनी ते संगीतबद्ध केलं आणि लता दीदी ते गायल्या. आजही वाजत असलेलं `ऐ मेरे वतन के लोगो' हे गीत ऐकताना पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना अश्रू अनावर झाले. लता दीदी आणि भारतप्रेम यांचं अद्वैत म्हणजे हे गीत.

मराठी भावगीताला दीदींनी वेगळाच आयाम दिला. ग. दि. माडगूळकर यांचे शब्द, सुधीर फडके यांची चाल आणि दीदींचा आवाज यांनी मराठी चित्रपट संगीतात अनेक विक्रम केले. 'आनंदघन' या टोपण नावानं त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिलं.

लता दीदींना असंख्य पुरस्कार लाभले. त्यात १९६९ सालचा पद्मभूषण आणि १९९९ साली प्राप्त पद्मविभूषण हे सन्मानही आहेत. चित्रपटसृष्टीतील असामान्य कामगिरीबद्दल `दादासाहेब फाळके पुरस्कार' सन्मान १९८९ मध्ये त्यांना प्रदान करण्यात आला. भारतातील सर्वोच्च `भारतरत्न' हा गौरव त्यांना २००१ साली प्रदान करण्यात आला.

आजच्या बदलत्या काळात आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जमान्यातही लता मंगेशकर या स्वर्गीय सुरसम्राज्ञीचं स्थान अस्पर्श आहे. या आवाजात पंचम आहे, असं दीनानाथ म्हणत असत. या आवाजानं गेली ७० वर्ष आपली मोहिनी कायम ठेवली आहे.

लता मंगेशकर यांची फक्त गीतंच नव्हे तर या पिढीला त्यांच्या आवाजातला गीतेचा अध्याय आवडतो, त्यांचं 'वंदे मातरम्' तर अनेकांच्या ओठावर असतं. त्यांच्या आवाजातली सगळी भजनं आजही ऐकली जातात. हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबद्ध केलेल्या ज्ञानेश्वरांच्या रचना आणि सावरकरांची स्फूर्तीगीतं लता आणि हृदयनाथ यांनी घरोघरी पोचवली आहेत.

या आधीच्या पिढीनं लता मंगेशकर हा आवाज लहानपणापासूनच ऐकला आहे. 'नीज माझ्या नंदलाला हे गाणं त्या काळात प्रत्येक आई ऐकवायची. 'प्रेम स्वरूप आई' हे गाणं ऐकलं की अनेकांना आईची मनापासून आजही आठवण येते. हृदय हेलावणारी ही स्वरांची जादू फक्त दीदींच्याच आवाजात आहे. अशी असंख्य गाणी आपल्या हृदयात आहेत.

आज लता दीदी ९० वर्षांच्या झाल्या आहेत. त्यांनी आपली शंभरी साजरी करावी ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

# मु. पो. गुळसुंदे

## श्रीराम धैसास, मुंबई

खूप वर्षांनी गुळसुंद्याला जाण्याचा योग आला. गुळसुंदा हे रायगड जिल्ह्यातले पनवेलपासून साधारण वीस एक किलोमीटर अंतरावरचे छोटेसे गाव. रायगड जिल्ह्यात बऱ्याच गावांना दोन नावे असतात, सामान्य माणसांसाठी आकारांती आणि सरकार दरबारी एकरांती. म्हणून गुळसुंदा किंवा मौजे गुळसुंदे. मी माझ्या 'टीनस्' मधे असताना माझी मावशी या गावात राहायची. मी नेहमी उन्हाळ्याच्या सुट्टीत बरेच दिवस तिच्याकडे राहायला जात असे. येथील माझी मावस भावंडे म्हणजे अलका ताई, कल्पना माई, अविनाश व महेश थोड्याफार फरकाने माझ्याच वयाची होती. त्यामुळे वयाच्या या विशेष टप्प्यावरच्या, या गावाशी निगडीत काही आठवणी, कारणांनी किंवा विनाकारणच लक्ष्यात राहिल्या आहेत.

सुधामावशीचे गुळसुंद्याचे घर तसे लहानच होते, पण सोईचे होते. सुरवातीस पडवी. तेथे दिवसा वसंतरावांचे तलाठी ऑफिस असे व जेव्हा ते नसायचे तेव्हा आम्हा मुलांचा तेथे वावर असायचा. पुढची खोली म्हणजे बेडरूम-कम-लिविंग. पाहुणे मंडळींचे स्वागत येथेच होत असे. येथे भिंतीवर शोपीसेस, म्हणजे मुलांचे लहानपणचे रंगीबेरंगी तसबिरीत फ्रेम केलेले फोटो. त्या पुढे स्वयंपाकघर-कम-डायनिंग रूम. गॅस येण्याआधी येथे जमिनीवर मातीच्या चुली व स्टोव्ह ठेवण्यासाठी अल्युमिनियमचा पत्रा ठोकलेले टेबल होते. लाकडाचे जाळी-जाळीचे फडताळे होते. भांडी-डबे ठेवायला "मांडण" होती. देवांची वस्ती पण याच खोलीत होती. त्यात छोट्या पितळी मुर्त्या व गणपती आणि बिडकर महाराजांच्या तसबिरी होत्या. शेवटी मागची पडवी. यात पाणी तापवण्यासाठी मातीच्या चुली, सरपणाची फाटी ठेवण्यासाठी जागा व मोरी-कम-बाथरूम. सकाळचा दंतधावनचा विधी येथील चुलीभोवती टाईमपास करत होत असे. भाताच्या तुसाची बनवलेली राखुंडी दंतमंजन म्हणून वापरली जायची. कालांतरानी गुलाबी चंचला टूथपावडर, नोगीची काळी माकड छाप टूथपावडर, सफेद कोलगेट टूथपावडर असे बदल होत गेले.

सुरवातीस वीज नव्हती तेव्हा कंदील, रॉकेलची टीमणी व चिमण्या आणि पेट्रोमॅक्स बत्त्या वापरत असत. घरातील एकुलते एक मनोरंजनाचे साधन म्हणजे बुशचा ट्रांझिस्टर. अर्थात आम्ही मुले म्हणजे पण फुल टाईम-पास होतोच! पुढे वीज आल्यावर रॅलीजचा टेबलफॅन स्टुलावर स्थानापन्न झाला.

घरातील सगळी गृहकृत्यदर्श कामे सुधामावशी व अलकाताई करायची. यात कपडे नदीवर नेवून धुणे, भांडी घासणे, केर-वारे, आणि मदर-ऑफ-ऑल-वर्कस् म्हणजे जमिनी सारवणे. अतिशय कष्टाचे काम. आधुनिक योगामधील सर्व आसनांच्या एकत्र परिणामांची खात्री. अलकाताई स्वयंपाकात सुधामावाशीला मदत करत असे. एकदा सुधामावशी बाहेर गेलेली असताना तिने केलेल्या मऊ भाताची कथा आम्हा भावंडांत एक गमतीचा विषय म्हणून वारंवार आठवली जायची.

सुधामावशीच्या अगदी शेजारी कल्पनाच्या वर्गातला प्रमोद राहायचा. त्याचा नुकत्याच दाढी-मिश्या फुटलेला मोठा भाऊ, पुढच्या दरवाज्याच्या खिळ्याला लहान आरसा अडकून दाढी करायचा. तेव्हा फोम वगैरे लाड नव्हते. एकच साबण, गोदरेज राउंड. तो संपला असेल तर चक्क अंघोळीचा साबण. दाढीचा

ब्रश हा घोड्याच्या केसांचा बनवतात असे त्यावेळचे आमचे जनरल नॉलेज होते.

त्यांच्या पुढे एक सोनार कुटुंब राहायचे. तेथे राहणारे आजोबा सोने वितळवून, लाकडी ओंडक्याच्या भोकातून खेचून सोन्याची तार बनवायचे. केमिस्ट्रीच्या लॅब मधे बघायच्या आधी चीनीमातीची क्रुसिबल त्यांच्याकडे बघीतली होती. सुंदर चमकदार तार बनताना पाहून छान वाटायचं.

घराच्या पुढे सर्व बिऱ्हाडांना कॉमन आंगण होते. क्वचित प्रसंगी मी व अविनाश आम्ही रात्री आंगणात झोपायचो. आमावस्येच्या जवळचा दिवस असला की वर आकाशगंगेत पोहणाऱ्या असंख्य चांदण्यांनी आकाश लडखून गेलेलं असायचं. आता शहरापासून दूरही धड आकाशदर्शन होत नाही. याच आंगणातून एकदा आम्ही सुर्यग्रहाणाचाही आनंद घेतला होता. फुटलेल्या बाटलीच्या काचेला दिव्याची काजळी लावली की झाला एक्लिप्स गॉगल.

समोरचं “मिन्हत” नावाच्या व्यक्तीचे दुकान होते. बहुतेक ओरिजिनल नाव “मिन्हा” असावे. त्याच्याकडे लिमलेटच्या गोळ्यांपासून, विडी, माचीस, स्टेशनरी आयटेम इ. सर्व मिळायचे. म्हणजे गावातले सुपर स्टोअरच म्हणाना.

“मिन्हत” च्या पुढे, नदीकडे जाणारा रस्ता होता व त्यापुढे तुपे वाण्याचे दुकान होते. “पुढे दुकान – पीछे मकान”. उन्हाळ्याच्या सुट्टीत त्यांच्याकडे पण मुंबईची पाव्हणी यायची. ब्राम्हणांकडे पुर्वी मुले संध्याकाळी परवचा व रामरक्षा म्हणत, तसे तुप्यांकडे रोज पंधरावीस मिनिटे हरिपाठ व्हायाचा. त्यात “हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी” याचा समावेश असे. आधुनिक काळात खेड्यांत देखील टीव्हीवर संध्याकाळी सास-बहुचा प्राईम टाईम चालू झालेला असतो. आधुनिक मनोरंजनाच्या सोयींमुळे आपण काय कमावलं व काय गमावलं याची बॅलंस शीट मांडायला हवी. पण तो एक स्वतंत्र विषय आहे.

सुधामावशीचे गावात अनेक जणांकडे येणेजाणे होते. यातीलच एका जोशी कुटुंबात माझ्या सौ ची भाची दिली आहे. त्यामुळेच गुळसुन्द्यास जाण्याचा योग परत आला. त्यामुळे गतआठवणीना उजाळा मिळाला. या जोशांकडेच मी लहान असताना एकदा रामनवमीच्या दिवशी कीर्तनाच्या कार्यक्रमास गेलो होतो. तो प्रसंग मला जसाच्या तसा आठवला.

वसंतरावांच्या ऑफिसमधली वर्दळ बहुदा ७/१२ च्या उताऱ्यासाठी असायची. तसेच काही वेळेस लमाणी स्त्री-पुरुष तात्पुरती शिधापत्रिका नूतनीकरण करण्यासाठी यायचे. त्यांची नावे ऐकून गंमत वाटायची. ऑफिसमधे एक लाकडी कपाट, टेबल व खुर्ची असायची. साहित्यामधे कोरे कागद, कागद एकत्र बांधण्यासाठी लेससारखे लाल धागे, टाचण्या, रेषा आखण्यासाठी “रूळ”, पेपरवेट इ. गोष्टी होत्या. पट्टी, स्टेपलर, युपीन इ. आधुनिक वस्तूंचा स्पर्श अजून झाला नव्हता. फायली पण नव्हत्या. कागदपत्रांवर दोन्ही बाजूस जाड ब्राऊन पेपर लावले म्हणजे झाली फाईल. जुन्या कागद पत्रांचे गठ्ठे, लाल मांजरपाट कापडात गुंडाळून फळ्यांवर रचून ठेवत. अशा रेकॉर्ड्सना दफ्तर म्हणायचे. वसंतरावांचे अक्षर सुंदर होते. अजूनही त्यांची वळणदार सही आठवते. याच पडवीत आणखी एक ऑफिसचा भाग नसलेली पण महत्वाची वस्तू म्हणजे नातेवाईकांची आलेली पत्रे टोचून ठेवण्याकरता हँगर सारखे मिळणारे त्यावेळचे गॅजेट. ही वस्तू घरात आहे म्हणजे माणसे व्यवस्थित असल्याचे एक चिन्हच.

आमचा दुपारचे जेवण झाल्यावरचा प्रमुख टाइमपास म्हणजे पत्ते. त्यात सात-आठ, पास्तीन्दोन (पाच-तीन-दोन), झब्बू (सिंगल-गाड्देरी), इ. व भरपूर वेळ चालणारा नोठ्याठोम (नॉट-अॅट-होम) अशा अनेक खेळांचा सामावेश असे. बरेच वेळेस खेळाचे सूप चिडचिडीत व वादात वाजे. काहीच नाही तर, जो गाढव होत असे त्याला अचानक घाईची “लागत” असे. आणि मग हे “लागणे”, साथी सारखे पसरे. मग काय पत्ते बंद, व सगळ्या मुलांची फैय्यर हातात डबे घेऊन, बहुदा

अनवाणी पायांनी, भर दुपारी तेव्हा न-चालू झालेल्या कोंकण रेल्वेच्या लायनी पलीकडे गप्पा मारत, दगड भिरकावत प्रस्थान करायची. येताना करवंदाच्या जाळीतली करवंदे कोंबडा-की-कोंबडी करत खायची. स्वच्छतेचं प्रस्थ तेव्हा एवढं नव्हतच. "निर्मलग्राम" योजनांसारख्या योजना नव्हत्या. परत आल्यावर बहुदा पत्ते परत खेळत जात नसत. कधीकधी "व्यापर" खेळायचो. इंग्रजी मिडीयमला जाणारी मुले मुंबईत त्याला ट्रेड-गेम म्हणायची. यातील काही कार्डे किंवा सोंगट्या हरवलेल्या असत. सगळेच पर्फेक्ट असेल तर काय मजा ना? तसेच पत्त्यातही बहुतेक वेळा राणी, राजा किंवा सत्ती ची भूमिका बजावण्याची जबाबदारी पेनानी लिहून जोकरवर टाकली जात असे. इतर घरगुती खेळांमध्ये पाटावर पट काढलेला सोंगट्याचा खेळ, मुलींमध्ये आवडीचे सागरगोटे किंवा बांगड्यांच्या तुकड्यांनी खेळायचे "पाच-आणि-खाच" असे खेळ होते. आधुनिकतेचा स्पर्श झालेले खेळ म्हणजे लुडो, बुद्धिबळ, इ. क्वचितच खेळले जायचे.

बाहेरच्या खेळांत गोट्या, भोवरा, इ. खेळांपेक्षा क्रिकेटला प्राधान्य असे. मला तेव्हा क्रिकेटमधील काही विशेष समजत नसे, पण मुंबईचा राहणारा म्हणून उगीचच भाव मिळत असे. मग मागच्या कोरड्या पडलेल्या शेतात माती जरा सारखी करून क्रिकेटचा डाव होत असे. तेव्हाच भारतीय संघाचा कसोटी-सामना चालू असल्यास क्रिकेट खेळण्यास आणीखच जोर येत असे. मग भेन्डीच्या झाडाच्या फांद्या तासून यष्टी बनवल्या जायच्या. टीममधे शेजारची पोरें व घरी आलेली पाव्हणी यांचा समावेश असे.

गुळसुंद्यात काही पर्यटनस्थळे होती. बस स्टँड, नदीकाठ, नदीकाठचे शिवमंदिर, गावचे पशुवैद्यकीय केंद्र, इ. तसेच काही अंतरावर तेव्हा चालू न झालेलं पण पूर्ण तयार असलेले आपटा रेल्वे स्टेशन, किना इंडस्ट्रीच्या लहानश्या उंचवट्यावरचे मंदिर, बाजूच्या गावातली पुई इ. सायंकाळची एकस्कर्शन म्हणून जाण्याची ठिकाणे पण होती.

लहान गावातला बस स्टँड हा नेहमी गावातल्या लहान मोठ्या घटनांचा, गावातल्या व्यक्ती आणि वल्ली यांचा साक्षीदार असतो. त्याच्या आसपास नुसते प्रवासीच नव्हे तर रिकामटेकडे, फुके, भटके, गावातली मुक्त जनावरे यांचा वावर असतो. गुळसुंद्याचा बस स्टँडही त्याला अपवाद नव्हता. पण आम्हा लहान मुलाचं मुख्य आकर्षण म्हणजे तेथील वडा-भजींची टपरी. जवळजवळ बस स्टँड मधेच विलीन झालेली. तेव्हा वडा-पाव नव्हता, नुसताच बटाटावडा होता. आम्हा पाहुण्यांमुळे त्याचा काही खूप खप वाढायचा अशातली बाब नाही, पण नुसत्या तेलकट-तिखट वासानी चित्तवृत्ति फुलून यायच्या.

गुळसुंदा गाव पाताळगंगा नदीकाठी वसलेलं आहे. नदीच्या घाटालगत सुंदर शिव मंदिर आहे. अगदी हेमाडपंथी वगैरे नाही, परंतु बऱ्यापैकी पुरातन आणि आकर्षक! शिवमंदिराचा परिसर विस्तीर्ण आहे. परिसरात अनेक लहान-लहान मंदिरे आहेत. त्यात हनुमंताचे मंदिर उल्लेखनीय आहे. येथील रंगमंचाचा उपयोग गावातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम व लहान-मोठ्या इतर कार्यक्रमांसाठीही होतो. अलकाताईचे लग्न पण इथेच झाले होते. मंदिराच्या पुरातन लुक-अँड-फीलला हात न लावता मंदिराची देखभाल चांगली ठेवली आहे.

एक रस्ता सुधामावशीच्या घरासमोरूनच नदीकाठी जायचा. या रस्त्याच्या शेवटीचा नदीकाठ मुख्यत्वे भांडी-कपडे धुण्यासाठी वापरला जात असे. तरीही पाणी स्वच्छ असायचे. एकदा मी नदीकाठी उभा असताना पाय घसरून नदीत पडलो. पूर्णपणे पाण्याखाली गेलो. ७-८ सेकंदच पाण्याखाली होतो, पण जे दृश्य काही सेकंदाकरता पहिले ते कायम लक्ष्यात राहिले आहे. माझ्या जवळच रंगीत मासे तरंगत होते. खाली काही वनस्पती व हिरवेगार शेवाळे होते. वनस्पतींच्या काही पानांवर लहान हवेचे बुडबुडे टेक-ऑफ घेण्याच्या तयारीत होते. जीवनात लहान-लहान गोष्टींत खूप आनंद असतो हेच खरं. अर्थात याची किंमतही मला चुकवावी लागली. पडल्यामुळे पाऊल

मुरगळून सुजलं होतं. सूज जवळजवळ एक आठवडाभर होती. पण माईने निर्गुडीच्या पानांनी शेकून दुखीवर मायेची फुंकर घातली होती.

नदीकाठी याच ठिकाणी पलीकडच्या गावी जाण्यासाठी लहान बोटीची फेरी लागायची. नावाडी गुळसुन्द्यातील लोकांची व पलीकडच्या गावातील लोकांची ने आण करत असे. पण यासाठी तिकीट नव्हते. गावातील लोकं वर्षाकाठी नावाड्याला ठराविक धान्य किंवा इतर खाद्य सामान देत असत. किती सोप्पं जीवन होतं. क्रेडीट-डेबिट नव्हतं म्हणून क्रेडीट-डेबिट कार्डही नव्हत, मोबाईल नव्हता म्हणून रिचार्जही नव्हता. रिचार्ज नव्हता म्हणून माणुसकी कधी पुन्हा-पुन्हा चार्ज करावी लागत नसे. ती असेच. मेणबत्त्या पेटवून ती सिद्ध करावी लागत नसे.

बस स्टँडच्या जरासे पुढे गेले की उजव्या हाताला गावातील शाळा होती. पांच-सहा वर्गांची. सोप्यावर ठेवलेले वर्ग, कौलारू. समोर मैदान, कुंपण न घातलेलं. शाळेच्या वास्तूला लागून ध्वजस्तंभ होता. म्हणजे थोडक्यात पिक्चर-पर्फेक्ट. मैदानाच्या दुसऱ्या बाजूला एक लहानशी वास्तू होती. पशुवैद्याची. पुढयात गुरांना तपासताना बांधून ठेवण्यासाठी यू आकाराचा लोखंडी ऑपरेशन-बेड होता. मधल्या सुट्टीत शाळेतील मुले या ऑपरेशन-बेडला लटका-लटकी करत खेळायची. कधीकधी गावात आलेली माझ्यासारखी पाव्हणी देखील या लटका-लटकीचा आनंद घ्यायची.

शाळेच्या तसेच पुढे, साधारण एक किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या डाव्या हाताला किना नावाची बॅरलची कंपनी होती. लहानशीच पण ती पण शाळेसाराखीच पिक्चर-पर्फेक्ट दिसायची. परिसर स्वच्छ असायचा व कंपाऊंड मधे लाल-पांढऱ्या रंगाचे तयार बॅरल ठेवलेले असायचे. त्याच कंपनीच्या जमिनीवर पण रस्त्याच्या पलीकडे लहानसे मंदिर होते व भोवती छोटीशी बागही होती. बागेत निवांत बसायला बाके होती. आम्ही मुले सायंकाळच्या भटकंतीसाठी तेथे जायचो.

गावाच्यापुढे एक किलोमीटरवर लोना ही डायस्टफ बनवणारी कंपनी होती. जवळच रस्त्याच्या पलीकडे आपटा रेल्वे स्टेशन. तेव्हा कोंकण रेल्वे चालू झालेली नव्हती पण आपट्यापर्यन्त मालवाहतूक सुरु झाली होती. दिवसातून मोजक्याच मालगाड्या यायच्या. प्रवासी वाहतूक नसल्याने रेल्वे स्थानक स्वच्छ व सायंकाळचा फेरफटका मारायला चांगले ठिकाण होते. आमच्या वेळेस एक आख्यायिका होती, रेल्वे लाईनवर लोखंडाचा तुकडा ठेवला व वरून गाडी गेली तर त्याचे लोहचुंबक होते. मी बरेच वेळा ट्राय केले आहे. पण एकतर गाडीच्याच खडखडाटानी लोखंडाचा तुकडा खाली तरी पडायचा किंवा दूर फेकला तरी जायचा. लोहचुंबक कधी बनलंच नाही. कधीकधी वाटायचं आपण ठेवलेल्या लोखंडाच्या तुकड्यामुळे गाडी रुळावरून घसरली तर?

गोष्टी अनंत असतात ... काही आठवणीत असतात ... काही साठवणीत असतात ... आठवणीतील गोष्टी कागदावर उतरतात ... साठवणीतील गोष्टी मनात दडल्या जातात.

हे सर्व मी आता चाळीस वर्षांनंतर लिहित आहे. पण आत्ताच्या पिढीतली मुले असे काही लिहू शकतील का? बहुतेक नाही. आता कुटुंब लहान - सुख महान सारख्या कल्पनांमुळे मुळात नातीच कमी होत आहेत. मग कोण कोणाकडे जाणार? आताची पिढी निसर्ग, खेडी, जंगले हे सर्व रिसॉर्टस् मध्ये शोधत आहे. नसलेल्या मामाच्या गावी पैसे भरून जात आहेत. खेडी बदलली आहेत. कौलारू घरे जाऊन कॉंक्रीटच्या मेंटेनन्स-फ्री वास्तू उभ्या राहिल्या आहेत. शेतात सुखलेल्या डिखळांची जागा मोकाट पसरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांनी घेतली आहे. पेरकुट व मेंदींच्या कुंपणांची जागा सिमेंट पोल्स व बार्ब-वायर्सनी घेतली आहे. लोना-किना अशा एकट्या दुकट्या कंपन्यांची जागा पाताळगंगेच्या परिसरात पसरलेल्या इंडस्ट्रीयल इस्टेटनी घेतली आहे. नदीचं पाणी पिण्या-पोहण्याच्या लायकीचे राहिलेले नाही. मग रंगीत मासे कुठून दिसायला? निर्गुडीची जागा मूव्ह नी घेतली आहे. मग

माईची माया कुठून अनुभवायला? प्रदूषणाच्या विळख्यात आकाशगंगा लुप्त झाली आहे. मग आकाशभर काय पण ओंजळभर चांदण्या तरी कश्या दिसणार? शिवाय, सुट्टीत मुलांनी पालकांची आवड-निवड नको का सांभाळायला? रायफल शूटिंग, हॉर्सरायडिंग, रॅपलि्लंग पासून अॅबॅकस, योगा, रोलर-स्केटिंग, सिंगिंग इ. नको का शिकायला? कॉम्पेटीशन साठी मुलांनी "रेडी" नको का असायला?

आता काय, प्रत्यक्ष भेटी ऐवजी व्हॉटस् ऍपवरच्या गुड मॉर्निंगला टचमध्ये राहणे म्हणायचे व फेसबुकवरच्या लाईकस् गणिक सोशल व्हायचे. फोन वर भरभरून बोलून भावना व्यक्त करण्याला नाती जपणे नाही का म्हणायचे? शेवटी जग बदलत आहे, आपणही बदलायला पाहिजे, असं म्हणून बदलून जायचे!

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

## मदतीची हाक

मंडळातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमांना गरज आहे तुमच्या मदतीची , सहकार्याची, आणि सहभागाची.

नोंदणीसाठी कृपया संपर्क करा - http://nemm.org/index.php/requests/volunteer

***Student volunteering hours will be recongnized.

# दिवाळी

विद्या भुतकर

लेक मोठी व्हायला लागली. सणासुदीला तिला तयार होताना निरखून पहायला लागली होती. कधी कपडे निवडतांना सुचवू लागली. हे चप्पल नको, तुझ्या ड्रेससोबत हे बूट्स घाल असं हक्कानं सांगायला लागली. तर कधी 'कुठल्या काळातले कपडे घालतेस गं आई?' असे टोमणेही मारायला लागली होती. तिच्या वळवून नीट केलेल्या केसांना हात लावून पाहू लागली होती. 'माझेही असेच सेट कर' म्हणून हट्ट करू लागली. कधी तिच्या ओठांना लावलेली लिपस्टिक पाहून, 'मलाही मेकअप करायचा' म्हणून रुसू लागली. आणि हे सगळं ती जवळून पाहतांना तिला मात्र एकच भीती होती....


शाळेत, कॉलेजमध्ये असताना आईनं अनेकदा हे करू नको, असे कपडे नको, असं वागणं नको, बोलणं नको ऐकवलेलं, अडवलेलं. पण हेही आठवायचं की सणासुदीला आवर्जून आई तिला आवरून द्यायची. लांब केसांची छान वेणी घालून द्यायची. गौरी गणपती, सत्यनारायण पूजेला आपल्या आधी तयार करून, कधी आपलीच साडीही नेसवून द्यायची. हळदी कुंकवाला आलेल्या बायकाही, "कसं तुम्ही पोरींचं इतकं छान आवरता' म्हणून कौतुक करायच्या. दिवाळीला फराळाची धावपळ करून ड्रेस शिवायची. आणि हे सगळं असूनही तिला अनेकदा आईशी वाद घालतांना, तिने कशाला नकार दिल्यावर वाटलेलं, "तू मुद्दाम माझं आवरत नाहीस. तुला माझ्यापेक्षा जास्त छान दिसायचं असतं ना?".

वाढत्या वयात कधीतरी आपल्याच आईबद्दल वाटलेली असूया आणि राग अनेकदा मनात घोळलेला. तो प्रसंग खरंच घडला की आपण हे केवळ मनातल्या मनातच बोललो हेही आठवत नव्हतं. इतक्यांदा विचार केलेले ते क्षण घडले की तिच्याच मनाचे खेळ होते हेही तिला आठवत नव्हतं. आणि प्रत्यक्षात तोंडातून बाहेर पडले नसले तरीही मनात आतवर रुतलेले. आणि यातून मनात आलेली एकच भीती..... माझ्या लेकीलाही असंच वाटेल का माझ्याबद्दल.

हॉस्पिटलमध्ये मुलगी झाली हे कळल्यावर गुंगीत तिने एकच वाक्य बोललेलं,"आता आपल्याला तिच्यासाठी ते क्यूट ड्रेस विकत घेता येतील." एक तो दिवस आणि आता? परवा दिवाळीला ती साडी नेसताना, दागिने घालतांना लेक पहात होतीच. म्हणाली, "मलाही लिपस्टिक लावून दे. हे गळ्यातलं घालून दे." "लिपस्टिक वगैरे लावायचं तुझं वय नाहीये अजून" या वाक्यावर लेकीनं तोंड मुरडलं. 'गळ्यात नको घालूस हे. तिथे १५ मिनिटांत माझ्याच हातांत आणून देशील." ती साडीच्या निऱ्या करत बोलली. आणि या वाक्यावर पुटपुट कानी आली,"मला माहितेय तुला माझ्यापेक्षा छान दिसायचंय."

आपण अनेकदा ठरवतो 'हे असं झालं तर मी अशी वागणार. असं बोलणार. अजिबात रडणार नाही. वगैरे वगैरे' . आणि तरीही तरीही लेकीचे शब्द ऐकून ती निऱ्या सोडून थबकली. आजवर त्या आईला बोललेल्या/न बोललेल्या वाक्यांचं ओझं डोक्यावर जड झालं. गळा दाटून आला आणि ती बोलली," तुला माहितेय मीही अशीच माझ्या आईला बोलले होते. खूप वाईट वाटलं होतं तिला. आणि मला आजवर वाईट वाटतं की तुझ्या आजीला मी असं बोलले. कारण ती नेहमीच मी छान दिसावं, राहावं म्हणून प्रयत्न करायची. तुझ्यासाठी मीही अनेक गोष्टी करते. तू माझी लेक आहेस. तुला खरंच वाटतं का मला असं वाटत असेल? ". लेक थांबली, मग थोडी शरमली,

नरमली आणि हसली. राहील का तिच्या लक्षांत माझ्यासारखंच अनेक वर्ष? काय माहित. पण तिला ओझं हलकं झाल्यासारखं वाटत होतं. आईला सांगायची हिम्मत झाली नाही निदान लेकीला तरी सांगू शकली म्हणून.





# कथा

## दाने दाने पर लिखा है

ज्योती जोशी

रेंगाळणाऱ्या अंधःकराचा पाचोळा सूर्यकिरणं झाडू लागली होती. साखर झोपेतल्या मुंबानगरीला न्याहाळत गॅलरीत १४ व्या मजल्यावर ती उभी होती. आत्ताची ही शांतता केवळ क्षणिक, नकली आहे हे तिला कळून चुकल होत...त्या शांततेत सुप्रभातची फेरी मारावयाचा अनावर मोह तिला झाला.

तिची ही रोजची सवंय...अमेरिकेत आल्यापासून हट्टाने जपलेली. दोन दिवसांपूर्वीच ती भारतात आली होती. अजून जेटलॅग गेला नव्हता. किती गजबज? वाहतुकीचा खडखडाट, मोटारींचे कर्कश हॉर्न, फेरीवाल्यांच्या आरोळ्या..आल्यापासून डोक फार कलकलून गेल होतं. कशीबशी न्याहारी उरकून, कमरेला आठवणीने फ्यानीपॅक अडकवून, घाईघाईत पायात बूट घालून ती भराभरा खाली गेली.

मनासारखी मोकळी जागा इथे आल्यापासून अजून दिसली नव्हती. कुठे जावं? एवढ्यात नजर पलीकडच्या रस्त्यावर गेली नि काय आश्चर्य, एक बगीचा दिसला. झपाझप पावलं त्या दिशेनं पडू लागली.

फटकाचं दार उघडून तिनं बागेत चालायला सुरुवात केली. तिच्या अपेक्षेपेक्षा बाग तशी बरीच मोठी होती. आजूबाजूच्या झाडाझुडूपांना नजरेनेच अभिवादन करत करत तिच्या फेऱ्या सुरु झाल्या. कृष्णकमळ अबोली, सोनचाफा, देवचाफा, तगर, कण्हेरि, फणस, आंबा.. किती प्रकारची झाडं? मनातल्या मनात खूप सुखावली. अमेरिकेत स्थाईक झाल्यापासून तिच्या बागेत या झाडांची उणीव फार जाणवत असे.

मनाशी गांठ बांधली. इथल्या माळ्याला भेटलंच पाहिजे धन्यवाद द्यायला.

तिच्या वाटलं होतं तशी ती काही एकटीच इथे नव्हती. तिच्यासारखे इतरही वेडे पीर होते सोबतीला. एक आजोबा वर्तमानपत्र वाचीत कोवळी उन्ह अंगावर शेकीत, कोणी व्यायामाला, कोणी भाविक बायका दुर्वा खुडीत, काही विद्यार्थी अभ्यास करत झाडाखाली एकांतात बसलेले.. बिचाऱ्यांना घरी जागा नसावी? मनात कळ आली. पुढे गेल्यावर झोपाळ्यावर लहान लहान मुल मुली खेळत होती. त्यांच्याबरोबर गणवेश घातलेल्या स्त्रिया होत्या. बालवर्गाची सहल घेऊन आलेल्या शिक्षिका असाव्यात?

एव्हाना तिची ३ री फेरी सुरु झाली, वाटेत एक लहान मुलगा अंदाजे ४-५ वर्षांचा, एकटाच दुडूदुडू धावताना दिसला. समोरच एक कुत्र्याचं पिल्लू गवतावर बागडत होत. मध्येच ते गोंडस पिल्लू थांबल तेंव्हा त्याच्याकडे एक टक लावून हसत राहिला. मग तिच्या लक्षात आलं. अरे, हा लबाड एकटाच? इकडे आला की काय पिल्लामागे? वर्गमित्रांना सोडून स्वतःच्या नादात ? त्या मास्तराणींच लक्ष कुठे होत? तो हरवलाय हे त्याच्या गावीही नव्हत.

नशीब तो मला दिसला नाहीतर..दुसऱ्या कोणीतरी त्याला कब्जात घ्यायला ही चांगली संधी होती. आजकाल अस बालकांचं अपहरण खूप ऐकायला येतं....त्याला शिक्षिकांकडे सुखुरूप पोहोचवायलाच हवं. पण कसं? त्याला उचलून तर नेण शक्यच नाही. आणि तो हात पाय झाडायला लागला, रडायला लागला तर? लोकांना तिच्याबद्दल वेगळाच संशय यायचा. मनात काळजीनं काहूर माजलं.

विचार करत क्षणभर उभी ठाकली. नकळत हात कमरेवर गेला नी एकदम तिच्या फ्यानीपॅकचा स्पर्श झाला. मुलीनं आठवणीनं त्याच्यात, तिचा मोबाईल, पत्ता, नांव, आणि दोन ग्रनोला बार हे सर्व ठेवून दिलं, आणि बजावून सांगितलं होतं, 'मॉम, कुठेही बाहेर जाताना ही थैली कमरेला बांध'. तिला थैलीतला ग्रनोला बार आठवला. मग युक्तीने तिनं त्या लहानग्याला अजिबात स्पर्श न करता, तो लांबूनच दाखवला.

"तुला बिस्कीट हवं"?

त्याच्याशी लडिवाळपणे गोड बोलत बोलत, ग्रनोला बारच्या आमिषावर झुलवत.. ती हळू हळू उलटी मागे मागे चालू लागली. तोही लगेच पिल्लाचा नाद सोडून तिच्या मागोमाग येऊ लागला. शेवटी एकदा ती त्या मास्तरणींजवळ पोहोचली. त्यांच्या तर गावीही नव्हत की तो परागंदा झालाय म्हणून? सुखरूप परत आणल्याबद्दल मात्र त्यांनी तिचे पुन्हा पुन्हा आभार मानले.

तो पठ्ठा, बिनधास्त! लगेच आरामात झोपाळ्यावर परत खेळू लागला. त्याला त्यांच्याकडे सोपविल्यावर एका वेगळ्याच आनंदात ती घराकडे वळली...नी तिच्या लक्षात आलं, तो ग्रनोला बार द्यायला शेवटी ती विसरलीच त्याला. तिन गुपचूप तो परत कमरेच्या चंचीत ठेविला.

दोन दिवसानी तिची मध्य प्रदेशाची सहल सुरु झाली. भारतात प्रथमच ती अशी एकटी सफरीला जात होती. बसमधले प्रवासी तसे अनोळखीच पण तिला त्याचं फारस वाटलं नाही कारण निसर्गाची सोबत तिला जवळची होती.

बस भराभरा अंतर कापीत राहिली. बहुतेक जण डुलक्या खात होती. ती मात्र खिडीकीच्या काचेला नाक लावून आजूबाजूच निसर्ग सोंदर्य आकंठ पीत होती. प्रत्येक झाडाचं वैशिष्ट्य तिला सहजपणे जाणवत होत. कोणाचा अवाढव्य बुंधा, कोणाच्या सरळसोट फांद्या तर कोणाच्या अस्ताव्यस्त पसरलेल्या.. हुबेहूब एकासारखा एक कुठेच नाही. झाडांमागे झाडं पळत होती. सागाची, खैराची, बाभळीची..मध्येच एखादं पांगाऱ्याचं शेंदरी रंगाच्या फुलानी उधळलेलं...बाहेरच्या निसर्गाची मिरवणूक बघण्यात ती रंगली. कुठही गेलं की तिथल्या मातीशी नातं जुळायला तिला जराही वेळ लागत नसे. परमेश्वराचं हे वरदान तिन मनापासून जपलं होतं.

बऱ्याच मैलांचा प्रवास झाला होता. तरी अजून मुक्कामाचं गाव लांब होतं. जरा वेळाने ड्रायव्हरने रस्त्याच्या कडेला बस थांबवली. इतका वेळ बसून तिच्या पाठीला रग लागली होती. रस्ता अगदी वळणावळणांचा चित्रातल्या सारखा! तिला मोह आवरेना. तिने ड्राइव्हरला सांगितलं, "पाय मोकळे करायला मी जरा पुढे चालत जाते. फार नाही लांब जाणार, तुम्हाला दिसेनच मी रस्त्याने चालताना. मात्र वाटेत पिकअप करायला मला विसरू नका हं"'

ती खाली उतरली. रस्ता अगदी निर्मनुष्य. चालायला सुरुवात केलीन वेडा मुसाफिर! आपल्याच नादात.. . . नि एकदम कुठूनतरी दोन बायका डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन झाडीतून बाहेर आल्या. त्यांना पाहून ती चांगलीच दचकली. काही न बोलता त्या तिच्याकडे एकटक बघत हमरस्त्यावर परत चालायला

लागल्या. रानातली झाडं कापणं खरं तर कायद्याविरुद्ध! इथे तर कुठे वस्ती नाही दिसली. किती लांबवर राहत असतील?... इंधन नाही? काय करतील बिचाऱ्यां? शेवटी पोटातल्या भुकेची आग!

अमेरिकेतील तिच्या अद्यावत स्वयंपाक घरांतील- मायक्रोवेव्ह,ओव्हन, रेफ्रिजरेटर, २४ तास मुबलक पाणी हे सर्व मनांत डोकावलं. मन नेहमीप्रमाणे कालवलेलं. ती ओशाळली अन खाली मान घालून मागे वळली बसकडे यायला. बस ड्राइव्हर लांबून हळुहळू तिच्या दिशेने येताना दिसला. बहुतेक तिला बोलवायलाच.

तेवढ्यात परत झाडीतून एक लहान मुलगा आणि त्याच्यापेक्षा जराशी मोठी मुलगी बाहेर आले. भाऊ बहिण असावेत. जवळ आल्यावर तिला जाणवलं. तो तिच्या नातवाच्या वयाचा ७/८ वर्षांचा असावा. लांब जायचं असेल अजून त्यांना? अंगावरची चिंध्यांची लक्तर अन खपाटीला आलेलं त्यांच पोट तिला अस्वस्थ करून गेल. किती भुकेली असतील? ती दोघ तिला ओलांडून त्या बायकांच्या मागे चालायला लागली..अनवाणी पायांनी.

तिला जवळच्या ग्रनोला बारची आठवण झाली. तो चांगला पौष्टिक आणि रुचकर असतो. जरास मोठ्यांदा ओरडून त्यांना थांबायला सांगीतल,

"अरे रुको तो सही. ठहरो ठहरो. ये ले लो". त्यांच्या मागे पळत पळत गेली. तिनं कमरेच्या चंचीतून ग्रनोला बार काढला नि त्यांना देऊ केला. त्याच्या ताईनं मानेनीच नकार दिला. भावाचा हात घट्ट धरून पुढे चालायला लागली.

“ये ले लो तो सही”! तिनं परत विनवलं.

एव्हाना बस ड्राइव्हर तिथे पोहचला. तो त्यांच्या बोलीभाषेतेतून परत त्यांना आग्रह करू लागला,

“मॅडम आपको दे रही है. कुछ बुरा नही है उसमे. अच्छा ही होगा. बिलकुल ले लो.”

“नही! हम ऐसा कुछ खाते नही!” त्या मुलीनं तिलाच ताकीद देऊन बजावले.

तिच्या लांड्या कप्रीस, डोक्यावरची टोपी, पायातले स्नीकर्स अन कमरेची फ्यानीपॅक या विदेशी कपड्यांकडे दृष्टी टाकून वर तिनं वर आणखीन दम भरला.

“हम किसी परदेसीसे कुछ नही लेते".

आणि मागे वळुन न पाहता लहानग्याला फरफटत त्या दोन बायकांच्या दिशेने पळायला लागली. त्या लहान मुलाचे मोठ्ठे काळेभोर तेजस्वी डोळे, सगळ्या दारिद्ग्रावर मात करून मनाची श्रीमंती रस्त्यावर धुळ उधळीत गेले.

अमेरिकेत नागरिकत्व घेऊन अजूनही ती कायम भारतीयच गणली जाते, आणि आता मायभूमीत मात्र ती सतत अमेरिकनच ठरते. पार पार खजील होते त्यांच्या नकाराने. पण एकीकडे त्यांचा फार अभिमानही वाटला. टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रातून वाचलेली इशाऱ्याची सूचना - कोणा परक्याने दिलेलं काहीही खाऊ नका. गुंगीचं द्रव्य घालून कॅंडी, बिस्किट इ. इ. चं आमिष दाखवून लहान मुलांना पळवितात. अशा टोळ्यांचा फार सुकाळ झालाय. परक्यांशी बोलुही नका.

तिला आठवलं तिची मुलगी अन शाळांतून नातवाला हेच पढवितात.

पण माझ्या मनांत कपट नव्हते. करुणेपोटी त्यांना मी तो बार देऊ केला. काय चुकलं माझं? स्वतःच्या वागणुकीचा हिशोब देत चरफडत तिनं तो बार परत थैलीत निमुटपणे टाकला. त्या दोन लहान मुलांचा विजयी संयम तिला लाचार करतो. कोणाशी फारस न बोलता ती बसमध्ये गुपचूप बसली. इतर प्रवाशांना

झाल्या गोष्टीची कल्पना नव्हती.. ते आपले फरसाण आणि लाडू चिवडा खाण्यात दंग होते.

प्रवास करता करता ते आता ग्वाल्हेरला किल्याच्या आवारात पोहोचले. इतके वर्षांची जुनी पुराणी इमारत पण अजूनही अबाधित होती. त्या काळचे वास्तुशास्त्र, कमानी, अर्धवर्तुळाकार खिडक्या, त्रिकोणात कोरलेली वेलबुट्टी, पशुपक्षी, अप्रतिम विलक्षण नक्षी.. या सर्व परिसराने तिच्या मनाचा कब्जा घेतला.

मातृभूमीचा आदर अधिकच बळावला. सगळी कलाकुसर, कोरीवकाम सगळ्याच कौतुक करत मनातल्या मनांत त्या जमान्यांतील ती राणी बनली.

पुढे एकदम गर्दी झाली होती. रहदारी थबकलेली.... जवळ गेल्यावर तिला उमगलं, किल्याच्या महाद्वाराशी दुरुस्ती चाललेली होती..तीन-चार मजूर खोदकाम करीत होते. कुतूहलाने तिनं जरा पुढे जाऊन डोकावलं. जे दिसलं ते तिला थक्क करतं...

एक प्रचंड भली मोठी संगमरवरी लादी-१०० पौंडांची तरी खास असावी- आदीमानवकालीन तरफेचा वापर करून अवघे दोघे जण लादी उचलीत होते. जुन्या जमान्यांतील कामाशी जुळविण्याची कोशीस चालू होती त्यांची. त्या महाप्रयासाचा घाम तिलाच फुटला. शेजारीच एक वृध्द त्यांना मार्गदर्शन करीत होता.

त्याला रामराम करून तीन हळूच पुसल,

'कसं करता हे?' एव्हढं अवघड जोखड काम? कुठे शिकलात?

"अभ्यास है!..ये सब अभ्यास! सिर्फ अभ्यास से आता है!!!" तोंडातील बिडी शांतपणे फुंकत तो तिला सहजपणे म्हणाला.

'किती सोपं तत्वज्ञान? आणि त्रिवार सत्त्य!' बाजूच्या पिंपळाची पानं तिच्या कानांत कुजबुजतात.

त्या सर्वांचे अचाट कष्ट तिला अवाक करतात. कृश कुडी ,त्याच्या उघड्या बरगड्या एकदम तिला पोलादी भासू लागल्या.

अमेरिकेतील तिच्या रहात्या घराच्या रस्त्यावर बांधकाम चालू असताना एक भलीमोठी चोंबडी क्रेन आसमंतातील निसर्ग सौंदर्याला ओरखडा आणते, अस तिला वाटायचं..फार राग यायचा. त्या क्रेनचं अस्तित्त्व तिला फार खुपत असे. पण आज त्या क्रेनला या मजुरांसाठी इथे ओढून आणावी अशी तिला फार प्रबळ इच्छा झाली. त्या वृद्धाच्या जरा अधिक जवळ जाऊन तिनं नम्रतेनं सांगितलं...

"तुम्ही तर मला आजोबांच्या ठिकाणी आहांत म्हणून मी तुम्हाला नमस्कार करते. मला आशीर्वाद द्या. माझं मन तुमचे हे सर्व परिश्रम पाहून फार थक्क झालंय. तुमच्या या प्रयासांनी मला खूप शिकवलं नि नम्र केलय. माझ्याकडे तुम्हाला देण्यासाठी तेवढ्या मोलाचं काहीच नाही.. आहे ती फक्त कृतज्ञता, कौतुक आणि आदर . मी ही चिक्की-मला माहित आहे, तुम्हा सर्वांच्या तोंडी पण लागायची नाही. पांडवांसारखी ती वाटून घ्यायला लागेल. अगदी एव्हढीशीच आहे तरी पण फुल ना फुलाची पाकळी म्हणून तुम्हाला देऊ इच्छिते. त्याचा आपण स्वीकार करावा, ही विनंती"....गहिवरली अन कमरेच्या थैलितला ग्रनोलाबार तिन त्याच्या हातात कोंबला.

अन काय आश्चर्य! हसत हसत त्या म्हातारबुवानी क्षणाचाही विलंब न करता त्या बारवरचे कागदी वेष्टन उघडिले नी त्याचे तुकडे इतराना वाटले..सर्वांनी ते तोंडात घातले नी परत कामास लागले.

त्या सर्वांचं स्मित हास्य मनातल्या मनात चघळत, सगळा किल्ला ती सावकाश चोखंदळपणे पायथा घालीत एका अनोख्या तृप्ततेने परतीच्या वाटेवर जाण्यासाठी बसमध्ये चढली.

# कविता

## अंतरीचे सूर

प्राची देशमुख

अंतरीचे सूर जेन्वा सहजी जुळून आले
विस्मृतींचे पाश तोडून आसवांचे ऋतू आले
धुंद तू अन् धुंद मी त्या क्षणैकात
तो क्षण एक माझे अवघे आयुष्य झाले

तव मीलनी प्रिया होते तुझी आभिसारिका
सहचारी तुझ्या पुनर्जन्म प्रत्येक घटिका
मी सुखाचे धुंद श्रावण तुझ्या मिठीत न्हाले
तो क्षण एक माझे अवघे आयुष्य झाले

विरला जरी आभास अन् निवली जरी ती ओढ रे
श्वासांत माझ्या तूच अन् स्पर्शात तुझेच चांदणे
अस्तित्व तुझे धूसर माझे क्षितीज झाले
विस्मृतींचे पाश तोडून आसवांचे ऋतू आले

का रिती दोघे आपण एकमेकांच्या विना
नि:शब्दांचे अर्थ जपण्याची खुळी का कामना
न एकरूप परि तुजवर सात जन्म मी वाहिले
तो क्षण एक माझे अवघे आयुष्य झाले

## सोनपरी

भास्कर

ओठाचा करु नकोस चंबु,
अन् भुवयांचा विशाल धनू
गालाच्या फुगल्या पु-या
नाकावर रागाचा पसारा. ¡¡
वद कसला आला घुस्सा,
दे सोडुनी सारी थट्टा
करुया बघ आपली बट्टी.
सोडुनिया क्षणभर ची कट्टि ,¡¡
बाळे तु प्रिय मज फार.
कसं सांगू तुजवर माया अपार
.मम जगण्याचा तुच आधार,
मम वरचा सोडुनिया राग, ¡¡
फुलवी गाली गुलाब,
मज ठाउक आहे बेटी
तु तर परक्यांची धनपेटी.
ओलांडून जासी घरांचा उंबरा. ¡¡
जसा माझ्या हृदयांतील प्राण.
(नात आजोबांच्या तोंडावर हात ठेवून)
असे नकोस बोलु अज्ज्या. ¡¡
मी तर तुमची सोन परी.
नका मज रडवु आता,
तुमचेही आसु आवरा . ¡¡
भास्कर ©

# I am the One..

प्रणिता देशमुख

I am the One …
Who choose to be ME

I am the One…
Who choose to be a Mother.
Mother who is ever loving as Mother Nature…
All I know is, To be Compassionate,
To be nourishing,
To be caring,
Feels like, I am the embodiment of unseen,
untouchable energy of Mother Nature.

I am the One…
Whom One can talk,
One can ask,
One can Laugh with,
One can share its sorrow
One can love…

I am the One…
Who choose not to create anything but,
Still be channel to create human beings…

I am the One...
Who choose not to be sculptor but,
Still sculpt disciplined minds...

I am the One…
Who choose not to be the shape of the world
but,
Designing human character in me ; around
me.

I am the One…
Who choose not to work with materials but,
Work on tantrums and demands of my lovely
offspring.

I am the One…
Who choose to live from the heart and in
hearts.

I am the One…
Who has ample time to admire creator's
creativity,
Observe around,notice that grass do change
purple,
Hear the birds, watch swans hour long,
Look up at the stars..Yes I am that one..

I am the One…
Who can breath without planned purpose.
I am the One…
Who just be A being.
I am the One…
Who observe myself observing endlessly.
I am the One…
Who see observer in ME.
I am the One…
Who lets observer be my guide.
I am the One…
Creator of self and creation itself.
YES I am the one…
One with everything and everyone…
YES my friend I am the one..I am that one.

# वीर जवानांचा पोवाडा

सौ. मंजिरी परांजपे

करू वंदन अमर ज्योतीला (2)
भारताच्या वीर जवानांना (1)
वीर धरणीच्या सुपुत्रांना (1)
बलिदान दिले रक्षणा देशाची शान होSS जी जी (2)

फेब्रुवारी 14 सकाळ
ताफा सैन्य दल वाहनांचा
चाले मार्ग जम्मू-श्रीनगरचा
मनी भाव देशसेवेचा हो... जी जी

अवचित घात झाला हा SS
अवचित घात हो झाला
छुपा शत्रू धडकला ताफ्याला
धमाका होऊन हाS हाS कार झाला
40 शूर मुकले जीवा की होS जी जी

( **गद्य** ) श्री शिवछत्रपतींना अफजलखानाने भेटीस बोलावून दगाफटका केला, ही तर पाठीत खंजीर खुपसण्याची शत्रूची नियतच आहे. तसेच, गनिमी कावा ही श्री शिवछत्रपतींची रणनीती होती, तीच आपल्या प्रधानमंत्री यांनी अवलंबिली

ठेवूनि आदर्श शिवरायांचा
केला वापर गनिमी काव्याचा
निवडला मार्ग वायुदलाचा
निघाला तांडा 12 मिराजांचा होS जी जी

( **गद्य** ) 26 फेब्रुवारी पहाटेची वेळ, ठरली की हो काळ अतिरेक्यांचा

धुव्वा उडवोनि, विजयी होऊनि
परतला तांडा विमानांचा
जगी घडविला, नवा इतिहास हो S जी जी

( **गद्य** ) भारतीय सेनेचे हे तांडव पाहून शत्रू एवढा घाबरला की त्याने बंदिवान केलेल्या अभिनंदन वर्धमानला सन्मानाने मायदेशी परतविले

अशी कीर्ती थोर सेनेची
वाढवी शान भारताची
परंपरा स्वातंत्र्यवीरांची
त्रिवार मुजरा, भारतीय सेनेसी हो S जी जी

मी एक भारतीय शाहीर
सांगतो कथा शूर सैनिकांची
रसिक हो सदा स्मरा या वीरांसी होS जी जी



|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL



# चाहूल हेमंताची

विकास पाध्ये, नाशुआ, न्यू हॅम्पशायर



ग्रीष्म ऋतूची होत सांगता
 हेमंताची चाहूल येता
दऱ्या दऱ्यांना सजवुनी आता
मुक्त बरसतो रंग विधाता!

निसर्ग घाले का रांगोळी?
कळे त्यासी का आली दिवाळी?
पर्वतराजी सजली पिवळी
रक्तवर्ण का घेऊनि भाळी?

मधुनी वाहे पवन खेळकर
उडवी रंगीत पाने भरभर
होता बाजू घन नभ काळे
तरुवर सोनेरी किरणांनी उजळे!

ताठ उभे हे वृक्ष सुरूचे
वसनं लेवूनि गर्द पाचूचे
आद्यगुरू जणू अध्यात्म्याचे
वेध न त्यांना ऋतू बदलाचे!

सृष्टी उधळी रम्य संपदा
हाच कृष्ण, अन् ही का राधा?
स्वर्ग धरेवर उतरे हा का?
देवत्वाची हीच प्रचिती का?

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

## Looking for a Graphic Designer

Good Volunteering oppourtunity at NEMM.

Graphic Designer Needed for Anubandh Magazine.
Please contact: seema.kanitkar@nemm.org

Students can apply.
Students Volunteering hours will be recognized by NEMM.

# कला

## रांगोळी

संगीता देशपांडे







# पाककृती

## 1) Exquisite Karanji Canapes-

https://indfused.com/2017/10/06/exquisite-karanji-canapes/




- *Servings:* 12
- *Difficulty:* easy
- **Ingredients**
    - 1 teaspoon white poppy seeds
    - 1 cup unsweetened shredded dry coconut pinch of salt
    - 1 teaspoon green cardamom seed powder
    - 2 tablespoons honey
    - 12 filo prebaked mini shells
    - 4 pistachio nuts, slivered (optional)
    - 4 almonds, slivered (optional)
    - 6 maraschino cherries (optional)
- **To make the Exquisite Karanji Canapes-**
    1. In a pan over medium heat dry roast the poppy seeds for about 3 to 4 minutes or until they are golden and toasty. Remove from pan and set aside.
    2. Turn the heat to low, add the dry shredded coconut and roast it until lightly golden. Remove from heat and let cool slightly.
    3. Mix together the toasted poppy seeds, coconut, salt and cardamom seed powder. Add the honey and mix in with your fingertips, crumbling the toasted coconut shreds.
    4. Fill the mini pastry filo shells, top with the nuts and cherries, if using, and bake in a preheated 350 degree oven for 8 to 10 minutes.
    5. Let cool to room temperature. Serve the enticing Karanji Canapes!

## 2) मूग ओट्स धिरडं

- प्रज्ञा गावडे



मुग ओटस् धीरडं

मोड आवलेले मुग, ओटस् वापरून केलेली पौष्टीक breakfast recipe.

साहित्य - 1 cup मोड आणलेले मुग, 1½ cup whole grain oats, 1 हिरवी मिर्ची, चवीपुरते मीठ, ½ cup दही, 1 tsp हळद, 1 tsp chat मसाला, 1 inch आल्याचा तुकडा, बारीक चिरलेली कोथिंबीर, कोणतीही हिरवी पालेभाजी किंवा इतर भाजी (पालक, बिट्रूट etc.), 2-3 चमचे तूप/तेल, तीळ/chia seeds

कृती -

1. वरील सर्व ingredients/साहित्य grinder मध्ये घालून बारिक करून घ्या. हिरवी पालेभाजी पालक किंवा बिट्रूट नंतर बारीक चिरून (न grind करता) ही घालू शकता.
2. हे मिश्रण 20 मिनीटं झाकून ठेवा.
3. नंतर गरजेपुरतं पाणी घालून पातळसर मिश्रण बनवा.
4. तव्याला थोडसे तेल/तूप लावून त्यावर वरील मिश्रण पातळ थर देऊन पसरून घ्या.
5. दोन्ही बाजूला सोनेरी रंग येईपर्यंत भाजून खमंग धीरडं बनवा.
6. दही, चटणी, लोणचं पैकी कशाबरोबरही serve करू शकता.

# पर्यटन

## उन्हाळ्याची सुट्टी

मनीषा बिडकर

उन्हाळ्याची सुट्टी! आपण कितीही मोठे झालो तरी हे दोन शब्द डोळ्यांसमोर लहानपणीच्या आठवणींचा खजिना उभा करतात! बस अथवा रेल्वेचा तो रोमांचक प्रवास, प्रत्येक स्टेशनवर त्या ठिकाणचे रुचकर पदार्थ चाखण्याची लगबग, आजी-आजोबांचं गाव कधी येतंय व कधी एकदा आत्ये-मामे भावंडांसोबत धमाल करायला मिळतिये ह्याची हुरहूर व तिथे पोहोचल्यावर सगळ्यांच्या लाडा-कौतुकात न्याहून निघण्याचा भरगोस आनंद! अहा!

अंगणात रंगणारे लंगडी-लुकाछीपी-खोखोचे खेळ, नदीवर पोहण्याच्या शर्यती, बागेत डेरेदार झाडांच्या फांद्यांवरचे उंच झोके घेण्याची चढाओढ, घनदाट वडा-उंबराच्या झाडांखाली मांडलेल्या भातुकल्या, आवळा-पेरू-आंबे-बोरं-चिंचा व इतर फस्त केलेल्या रानमेव्यांचीं मजा हे सर्वकाही मनाला स्वर्गीय सुख देऊन जाई. दुपारच्या जेवणात काकू / मामीने केलेल्या सुग्रास जेवणावर आडव्या हाताने ताव मारत, आंब्याच्या रसाच्या असंख्य वाटयांचा फडशा पाडत, तत्पश्चात एखाद्या अजगराला किंवा चक्क कुंभकर्णाला लाजवेल अशी ताणून दिलेली ढाराढूर झोप, हा तर उन्हाळी सुट्ट्यांचा लाडका कार्यक्रम. कधी दुपारी घरच्या थोरा-मोठ्यानं पासून ते छोट्या पिटुकल्यांर्चे रंगलेले पत्त्यांचे डाव, गाण्यांच्या भेंड्या, गप्पा गोष्टी, दुपारी बाहेरच्या त्या असह्य उन्हावर मारा म्हणून टांगलेले ते वाळ्याचे तट्टे व त्यांच्या गारव्यात आजी-आजोबांच्या कुशीत शिरून ऐकलेल्या त्या परी-राजपुत्राच्या अथवा चक्क भुतांच्या गोष्टींची मजा लुटणे ह्या सारखा दुसरा दैवी आनंद नसे. संध्याकाळी, जवळच्या उद्यानात उसाच्या रसाची व कैरी घालून केलेल्या भेळेची रेलचेल, कोल्डड्रिंक्स, कुल्फी, आईसक्रीमचे पुरवलेले हट्ट हे त्यावेळी जिभेवर व ततपश्च्यात्त आजवर आठवणीत पुरेपूर रेंगाळतात. अंगणात दिवेलागणीच्या वेळी शुभमकरोति-रामरक्षांचे सूर, पाढे-पर्वाच्यांची पारायणे, रात्री थंड वाऱ्यात अंगणातल्या मोगरा-जुई-रातराणीच्या दरवाळणाऱ्या सुवासात किंवा चांदण्यात, सडा-घातलेल्या गच्चीवर, हसत खेळत घालवलेल्या त्या सर्व सुट्ट्या मनात अजूनही खोल रुजलेल्या आहेत.

वर्षे ओलांडली, ते दिवस आता मागे सरले. मंडळी वेगवेगळ्या ठिकाणांना पांगली व प्रोजेक्ट्स आणि डेडलाईन्सच्या निराळ्या दुनियेत उन्हाळी सुट्टी कुठे तरी वेगळ्या स्वरूपाची झाली. तरीही सुट्टी म्हटलं व त्यात उन्हाळ्याची सुट्टी की आजही तेवढाच उत्साह वाटतो व लगबगीने त्याची तयारी व आखणी करणे ह्यात अपूप वाटते. बरेच बेत आखले जातात व त्या त्या वर्षी शक्य होईल तशी तिची पुरेपूर मजा लुटायचे आशय बांधले जातात.

मागच्या वर्षी बॉस्टन मध्ये येऊन मला जवळपास ४ वर्षे झाली होती आणि प्रथमच "रोड-ट्रिप" चा मनात विचार आला. मग काय, रोड-ट्रिप करायची तर ती उन्हाळ्यातच हे ठरलं व तत्पश्चात मी व माझी मैत्रीण अश्या आम्ही दोघिंनी ट्रिपवर जायचे ठरवले. मग गूगल वर रिसर्च सुरु झाला व दोघींच्याही "Bucket-List" वर पाहिलं असलेलं ठिकाण म्हणजे "ग्रँड कॅनयन" हे आमच्या सात दिवसांच्या रॊड-ट्रिपचे "डेस्टिनेशन" ठरले. ग्रँड कॅन्यनस हें USA च्या तीन स्टेट्स (ऍरिझोना,

युटाह व कॅलिफोर्निया) मध्ये व्यापलेली एक प्रचंड मोठी, खिंड व भव्य काड्यांची रांग आहे. दोन्ही बाजूंना निरनिराळ्या आकारात कोरलेले, विविध रंगांच्या छटा असणारे भलेमोठे कडे व त्यात नॉर्थ-रिम व साऊथ-रिम असे दोन अतिशय लोकप्रिय व लोभसवाणे टुरिस्ट स्पॉट्स आहेत. कोलोरॅडो नदीच्या प्रवाहाने शेकडो वर्षे शिल्पलेला हा निसर्गाचा अद्भुत चमत्कार थक्क करणारा आहे.

ऑग्स्ट मधल्या आमच्या रोड-ट्रिपचा दिवस उजाडला व आम्ही बोस्टनच्या लोगन विमानतळावर चेक-इन केले. आमची बॉस्टन ते फिनिक्सची (ऍरिझोना) फ्लाईट जवळपास साडेपाच तासांची होती. आम्ही फिनिक्स पासून कारने तीन तासांच्या अंतरावर असलेल्या साऊथ रिमला आधी भेट देण्याचे ठरवले होते. निरभ्र आकाशामुळे फिनिक्स जवळ आल्यावर "ग्रँड कॅनयन" चा थक्क करणारा Ariel-view अवर्णनीय होता. तिथेच आमची असंख्य छायाचित्रे काढण्यास जी सुरुवात झाली ते २०००च्या आकड्यात पोहोचून सुद्धा आम्हाला अजून ती कमीच वाटतात :). फिनिक्स मध्ये तेव्हा प्रचंड उन्हाळा होता पण संपूर्ण परिसर इतका सुंदर होता की प्रवासाचा थकवा कधीच सरला व फिनिक्सवरून आम्ही भाड्याने घेतलेल्या SUV गाडीत आम्ही आमच्या अविस्मरणीय रोड-ट्रिपची सुरुवात केली.

भले मोठे वाहतुकीचे रस्ते आमच्या ड्रायविंगसाठी मोठी पर्वणीच होती. आम्ही साधारण दुपारी ३ वाजता साऊथ-रिम नॅशनल पार्क जवळ "हॉलिडे इन्" नावाच्या हॉटेलात चेक-इन केले. फ्रेश होऊन लगेचच गाडीने, साऊथ रिम नॅशनल पार्कला पोहोचलो. तिथे व्हिसिटर सेन्टरवर चौकशीमध्ये कळले कि तिथल्या पॉइंट्सना भेट देण्यासाठी शटल्स आहेत व मग काय पुढचे ४-५ तास एका पेक्षा एक थक्क करणाऱ्या साऊथ-रिमच्या विविध निसर्गरम्य पॉईंट्सचा (नावाहो पॉईंट, माथेर पॉईंट, मोहवे पॉईंट, याकि पॉईंट, सनसेट पॉईंट) आस्वाद घेत व असंख्य फोटो काढत आमच्या पहिल्या दिवसाची आम्ही आमच्या प्रवास-डायरीत नोंद केली. सगळ्यात डोळे दिपवणारे ठरले "माथेर पॉईंट" वरून दिसणाऱ्या कड्यांच्या छटा, त्यांची अचंबित करणारी खोली, तिथला अविस्मरणीय सूर्यास्त, रात्रीच्या निरभ्र काळ्याभोर आकाशात लक्ख प्रज्वलित असणारे तारांगण. शहरात पोल्युशन मुळे, लाईट्स मुळे, ढगांमुळे आपण ह्या निसर्गाच्या चमत्काराला कसे मुकतो हे त्या दिवशी त्या असंख्य ताऱ्यांच्या मंडपाखाली जाणवले.

दुसऱ्या दिवशी साऊथ रिमहुन निघून, निसर्गरम्य दरी-खोऱ्यातून फिनिक्स च्या दुसऱ्या चमत्काराकडे वाट वळवली. "पेज" हे गाव तिथून २-२.५ तासांवर आहे व तिथे "बेस्ट-वेस्टर्न" हॉटेल मध्ये आम्ही उतरलो. "पेज" मधली तीन अतिशय लोकप्रिय ठिकाणं एकमेकां पासून १०-१५ मिनिटांच्या अंतरावर आहेत. सर्वात आधी आम्ही अगोदरच "बुक" केलेल्या आमच्या "लोवर-अँटेलोप्स" च्या टूरवर निघालो. Antelope Canyons हे Navajo च्या लाल सॅन्डस्टोनवर पूराच्या पाण्यानें व सुसाट वाऱ्याच्या आघाताने निर्माण झालेले सुरेख असे "आर्चेस" आहेत. गेरुव्या रंगाचे वेगवेगळ्या आकारात कोरलेले व स्तब्ध करणारे आर्चेस पाहून मन निसर्गासमोर नतमस्तक होतं. तिथे साधारणतः २ तास घालवल्यावर, आम्ही पुढे १५ मिनिटांवर असलेल्या "Horse-shoe-bend' वर त्या दिवशीचा सूर्यास्त बघण्याचा बेत आखला. Horseshoe Bend म्हणजे कोलोरॅडो नदीचे नागमोडी नदीपात्र. भोवतालीच्या उंच कड्यावरून बघण्याचे हे एक प्रेक्षणीय स्थळ आहे. कोलोरॅडो नदीच्या पाण्यात असलेल्या खनिजांमुळे त्या पाण्याला निळ्या-हिरव्या-जांभळी अश्या विविध रंगांच्या छटा प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे गेरुव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर ते निळसर छटा असलेलं नदीपात्र चित्रवत शोभतं. ह्या पार्श्वभूमीवर सूर्यास्त अनुभवणं म्हणजे जणू स्वर्गीय सुखच! पुढे "पॉवेल-लेक", हूवर डॅम आणि इतर कडे बघण्यात आमची संध्याकाळ मस्त गेली व रात्री आम्ही पेज मध्येच मुक्काम ठोकला.

तिसऱ्या दिवशी सकाळी अम्ही पेज वरून निघून कनब ह्या छोट्या गावाकडे निघालो, जे तिथून ३-4 तासांवर आहे. हॉटेलवर जाण्याआधी रस्त्यात "नॉर्थ-रिम" लागतं

म्हणून तिथली वाट धरली व साधारतः ३ वाजता नॉर्थ-रिम वर पोहोचलो. खूपच आश्चर्य वाटणारी बाब म्हणजे साऊथ व नॉर्थ रिम हें एकमेकांपासून अगदी विरुद्ध स्वरूपाचे आहेत. साऊथ रिम खडकाळ, वनरहित, गेरुव्या रंगाच्या खडकांनी सज्ज आहे तर नॉर्थ रिम, पिवळ्या-गेरुव्या रंगांच्या खडकांनी आकारलेला, उंच Pine झाडांनी सुसज्ज, हिरवागार प्रदेश आहे. नॉर्थ रिम नॅशनल पार्क मध्ये प्रवेश करताच, बैसोन्स, हरीण, मेंढ्या असे बरेच प्राणी तिथे नांदताना आढळतात. तिथल्या व्हिसिटर सेन्टर वरून माहिती मिळवली व छोट्याश्या ट्रेकला निघालो. तिथल्या स्तब्ध करणाऱ्या निसर्गाचा आनंद लुटला व नंतर इंपिरियल पॉईंट वर तिथला लोभसवाणा सूर्यास्त अनुभवाला. निसर्गाच्या इतक्या विविध छटा, इतकी त्याची अचंभित करणारी रूपे मी कधीच अनुभवलेली न्हवती.

तत्पश्चात, चौथ्या व पाचव्या दिवशी युटाह-मधील ब्राईस कॅन्यन व झायोन नॅशनल पार्क ही आमच्या दौऱ्याची पुढची दोन अविस्मरणीय ठिकाणं होती. ब्राईस कॅन्यन हे कनब पासून १.५ तासांच्या अंतरावर आहे. ब्राईस मध्ये "Hoodoos" म्हणजे एका विशिष्ठ प्रकारचे नक्षीकाम केल्याप्रमाणे कोरलेले खडक आढळतात. पाचव्या दिवशी आम्ही झायोन नॅशनल पार्कसाठी रवाना झालो. तिथे सुद्धा भरपूर सुंदर ट्रेल्स आहेत पण सर्वात आवर्जून अनुभव घ्यावा अशी तिथली "river-walk " आहे. डोंगराच्या पायथ्यापाशी खळ्खळ्णार्या नदीतून ट्रेक करण्याचा रोमांच शब्दांपलीकडला आहे.

ह्या सर्व ठिकाणांचे वैशिष्ट्य म्हणजे तिथे उपलब्ध असणाऱ्या सर्व सुविधा, तिथली स्वच्छता, माहिती पुरवणारी व्हिसिटर सेंटर्स, शटल-बसेस, रेस्टॉरंट्स, पार्क्स, भरपूर पार्किंग आणि त्याच बरोबर आढळणारा तो विलक्षण निसर्ग. त्यामुळे कुठल्याच ठिकाणावरून आपले मन सहजासहजी परत जाण्यास तयार होत नाही.

सहाव्या दिवशी वेगसचा लखलखीत आनंद लुटून तिथून परत ५ तासांचा ड्राईव्ह करत फिनिक्स एअरपोर्ट गाठलं. खरं म्हणजे परतीसाठी. वेगस-वरून थेट बॉस्टन येता आले असते पण आम्हला न-थांबता परतीचा तो अभूतपूर्व ड्राईव्ह अनुभवायचा होता. रात्री, फिनिक्स वरून बॉस्टनला परत जातांना मनात साठवलेले ते अविस्मरणीय क्षण, तो अद्भुत निसर्गसान्निध्य, तो निखळ आनंद हे सर्व कुठे तरी मनाच्या कोपऱ्यात लपलेल्या लहानपणीच्या त्या उन्हाळी सुट्टीची आठवण व त्याचा आनंद देऊन गेल. तर अशी होती माझी लाडकी उन्हाळ्याची सुट्टी :)

त्यामुळे, एक पटले - जरी आपल्याला आपले गेलेले क्षण परत मिळत नसले, तरी त्या सुंदर क्षणांची पुनरावृत्ती अश्याच सुंदर अनुभवांद्वारे आपल्याला पुन्हा परत मिळू शकते!




# बालजगत व युवा विभाग

## चित्रकला


ऋजुता दीक्षित





सेजल शिरोळे






|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
New England Marathi Mandal

## मदतीची हाक

मंडळातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमांना गरज आहे तुमच्या मदतीची , सहकार्याची, आणि सहभागाची.

नोंदणीसाठी कृपया संपर्क करा - http://nemm.org/index.php/requests/volunteer


***Student volunteering hours will be recongnized.

# शब्दकोडे

रोहिणी जोशी

दिवाळीची लगबग घरोघरी
कोडे सोडवा, करा तयारी !

- रोहिणी जोशी (अकरावी)



**उभे**

१- देवाच्या नावाने सुरू होणारा फराळ
२- सर्वात मोठा सण
४- चंद्रकोरी आकाराचा फराळ
७- खास चितळे बंधुंचा खाऊ

**आडवे**

१- चक्राकार काटेरी फराळ
२- जाळीदार फराळ
३- दारासमोर स्वागतासाठी
४- चकलीची छोटी बहिण
५- हा फटाका हातात धरा
६- भाजलेल्या पोह्यांचा फराळ

# कूट प्रश्न

शरयु जोशी

शरयुची कोडी - शरयु जोशी (सातवी) 19/10/19

1. पंख नाहीत तरीही मी तरंगतो,
डोळे नाहीत तरीही मी रडतो. ओळखा कोण?

2. शहरं आहेत पण घरं नाहीत. नद्या आहेत पण मासे नाहीत.
ओळखा काय?

3. मी सगळ्यांच्या घरी जाते, ते माझ्यासाठी खाऊ करतात.
पण माझ्याकडे नाही दात, म्हणून मग तेच खाऊ खातात.
ओळखा कोण?


4. फुलापानांचा माझा थाट, मला आधी भेटा, मगच जा घरात.
ओळखा कोण?

5. कुत्रा नाही पण तुमच्या बरोबर येतो,
अंधार नाही पण सूर्याला घाबरतो.
कधीतरी जातो पण नेहमी परत येतो.
ओळखा काय?

1. ढग 2. नकाशा 3. दिवाळी 4. तोरण 5. सावली

# दिवाळीची धमाल

अर्णव जोशी



# भूषणावह असे..

## Two Young Researchers Win Top Awards at the Massachusetts State Science & Engineering Fair

### Advait V. Nene



Advait's project invented an effective, fast, precise, and inexpensive method to deliver proton beam radiation to treat head and neck tumors in patients. His contribution in finding a new approach to solve the equation that computes the energy loss of a proton beam as it passes through a compensating material is fundamental and extends well beyond the working prototype that he built and presented at the science fairs. Advait won a First Award at the state fair and placed second overall in the state. He is a rising senior at Hopkinton High School, and he is interested in engineering, physics, and mathematics. His multidisciplinary talents have won numerous accolades at the regional and state science fairs since middle school. Beyond science, Advait is a talented mathematician, and has won honors in math competitions including Math Kangaroo and the AMC 8, AMC 10/12. He is an inductee of the National Honor Society, and also a National Merit Semi Finalist. In school, he plays bass clarinet in the band, and clarinet and tenor saxophone in the jazz ensemble. The jazz ensemble has won gold medals at both the regional and state levels, and was invited to play at the Hatch Shell. Advait distinguished himself further from his outstanding jazz ensemble, and won distinctions for outstanding musicianship and solos from MAJE, which is a statewide jazz competition. He has also earned a distinction from the Essentially Ellington festival.

Advait exemplifies the adage that music knows no geographic or cultural boundaries. He is a passionate exponent of Hindustani Classical music, and excels both in the vocal and instrumental forms. He started his vocal training at the tender age of four, and has won several accolades in singing competitions in the Boston area. He came third in the BMM SaReGaMa competition in 2015. In June 2018, Advait reached an important milestone in his musical journey with a Manch Pravesh, or a debut solo recital. Advait has been learning tabla since the age of six, and has passed the Madhyama Pratham Tabla exam from the Akhil Bharatiya Gandharva Mahavidyalaya with flying colors. He gives his musical and mathematical talent to the community freely, through his volunteer activities in the Hopkinton Community Summer Band, Russian School of Mathematics, and at the MICCA festival in his school. His hobbies include solving Rubik's cubes and similar puzzles. He also dabbles with origami online in his spare time. He is fluent in Marathi and indulges in the humor of cultural icon Pu La Deshpande.

## Adway S. Wadekar



Adway's project used a machine learning approach to predict adults at risk for developing opioid use disorder. His approach revealed that early initiation of marijuana before the age of 18 is a dominant risk factor for opioid abuse in adult life. This revelation highlights the role of educators, teachers and counselors in preventing America's opioid overdose epidemic. In addition to the First Place award, Adway also received a Certificate of Honorable Mention from the American Statistical Association at the Intel International Science and Engineering Fair in Phoenix. Adway is a rising junior at Saint John's High School, and his philosophy is to use his knowledge in the service of the society. His interests lie in harnessing the power of data science to solve social problems, especially focusing on mental illnesses and substance use disorders. His interdisciplinary projects in quantitative social sciences have consistently received won accolades at the regional and state science fairs, including two regional grand prizes since the middle school. His work on suicidal ideation earned the top prize in the poster competition at the Southern New England Junior Science and Humanities Symposium, and he was selected to represent the region at the National Junior Science and Humanities Symposium in Albuquerque. His other national-level honors include Top 300 BROADCOM Masters (semi-finalist) in the national middle school science fair, Grand Honors from the Johns Hopkins Center for Talented Youth, and second place in Nebraska 529 Essay Competition. In school, Adway is a member of the mock trial team, peer tutoring center, French club, and a volunteer for Be-Like-Brit which organizes drives to collect funds to support the boys and girls at Britt's Home in Haiti. He is a published author, and has presented his work at the IEEE Intl. Conference on Integrated Stem Education Conference and IEEE Computer Science and Applications Conference.

Beyond school, Adway believes in giving back to the community. He is an Intern in the Town of Westborough's Economic Development Committee, where his main responsibility is to evaluate and propose data management solutions. He is a Contributing Writer & Photographer for Metrowest's Community Advocate newspaper, reporting on a broad range of events such as Earth Day cleanup and Massachusetts Down's Syndrome Buddy Walk. Adway is an avid reader, and uses his spare time to read up on sports and geo political events. He also enjoys playing western classical music on the piano and the violin.

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

Become a Member

न्यू इंग्लंड मराठी मंडळाचे सभासद व्हा आणि आपले बंध, सांस्कृतिक वारसा मराठी मातीशी कायम जोडून ठेवा.

For Membership details click here:
http://nemm.org/index.php/membership/become-a-member-renew-membership

## Atharva S. Kasar



Atharva is Acton, Massachusetts resident recently graduated from Acton-Boxborough Regional High School. Currently he is studying Computer Science and Engineering at University of Pennsylvania.

Atharva has participated in many community events organized by New England Marathi Mandal and beyond. He has been studying Indian instrument Tabla since he five. Atharva's academic accomplishments are rivaled only by his personal strengths. His determination, hard work, persuasion and the intellect are beyond his years. One of his qualities I always admire is his deep sense of giving back to the society. He not only pursues his love of music for a passion but also uses it for the betterment of the society, especially bringing awareness about Autism. He conducted Tabla sessions for kids with Autism at Samnvedana School in Nagpur, India. He also conducted similar sessions at The Discovery Museums in Acton, MA for kids with special needs. He held many such sessions as music therapy throughout the year. Those Tabla sessions were well appreciated by families who attended **Especially For ME** events and by Museum staff as well.

In his academic life at AB Regional High School, he has represented his school on state and national level in various competitions such as MAML - Massachusetts Association of Mathematics Leagues, Yale University Science Olympiad, NSDL – National Speech and Debate League and achieved top tanking spots. Early this year he was chosen Regeneron Science (Formerly Intel Science) Talent Search Scholar – 2019 for his research - Analyzing the Effect of a Percussive Backbeat on Alpha, Beta, Theta, and Delta Binaural Beats

We wish Atharva the very best for his college journey and beyond..


# दिवाळी

## राधा ओढेकर (8 वर्षे)

दिवाळी भारतीय लोकांचा मोठ्ठा सण आहे. दिवाळीमध्ये चार दिवस असतात नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज. राम जेव्हां रावणाला मारून वनावसातून सीतेला घेऊन परत आला तेंव्हा अयोध्येतील सर्व लोकांनी दिवे आणि पणत्या लावून दिवाळी साजरी केली. दिवाळी हा एक मज्जेचा आणि दिव्यांचा सण असतो. दिवाळीमध्ये दिवा हा शब्द असतो कारण दिवाळीत दिवे आणि पणत्या लावतात. दिवाळीत आपण फराळ आणि मिठाई खातो. फराळ म्हणजे शंकरपाळी, चकली आणि चिवडाअसतो. मिठाई म्हणजे लाडू, गुलाबजाम आणि बर्फी असतात. दिवाळीत फटाके फोडतात. दिवाळीला आकाशकंदील घरात टांगतात. दिवाळी माझा आवडता सण आहे.

# Book Review:

## Proud A Young Readers Edition
## By: Ibtihaj Muhammad




"'Yes. I'm up for it," I said, quietly at first, and then I repeated it to convince the coach, but also myself. Finally I had a real purpose'" (Muhammad).

Over the summer, I read this book because my Mom told me to read it. I thought this would be another nonfiction book that she wanted me to read. With that type of mindset I sat down to read it. As time went on, I began to see things from Ibthihaj's perspective because as a woman I may face similar challenges that she too faced. I learned what worked for her and the events that shaped her to be the person she is today. This inspired me to write a review on the book.

Proud is a motivational story on defining borders, doing the unexpected and proving that anybody can do anything. Ibthihaj Muhammad is Olympic Medalist in the sport of fencing. From childhood, being an Afican American Muslim, was very difficult. She often found herself feeling like an outsider because people thought that her religion, her sex and her skin color would be an impediment to their friendship or work ethics. When she took on fencing, although she was highly skilled in it, people still doubted her and told her that she would never succeed and was better off becoming a lawyer or a doctor.

With the help of her parents and coaches who believed in her, she powered past the doubters, the haters and persevered to make her dreams come true. This autobiography by an American Hero will give you helpful advice and strengthen your beliefs in determination, hard work, family support and being able to stay strong no matter how tough things get.

## By: शमिका कानिटकर

Work Cited: Muhammad, Ibtihaj. Proud. New York. Little, Brown and Company/Hachette Book Group, 2018

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध ऑक्टोबर २०१९

# आवाहन ( पुढचे लिखाण )

नमस्कार मंडळी,

न्यू इंग्लंड मराठी मंडळ आपल्या विविध उपक्रमांद्वारे आपल्या सभासदांशी सातत्याने संवाद साधत असते. हाच संवाद 'अनुबंध' या मासिकाद्वारे द्विगुणित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे. त्यासाठी लागणार आहे तुमची साथ.

आपल्या अनुबंध साठी तुम्ही आमच्याकडे पाठवायचे आहे तुम्ही लिहिलेल्या कथा,ललित लेख, केलेल्या कविता, वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण,भेट दिलेल्या एखाद्या ठिकाणचे वर्णन, आठवण किंवा तुमच्या कॅमेरातुन काढलेली काही क्षणचित्रे,आपल्याला आवडलेला खाद्यपदार्थ आणि त्याची पाककृती , कला दालन या सदरात अपेक्षित आहे तुम्ही काढलेली हस्त-चित्रे, व्यंगचित्र, शब्दकोडी आणि अजुन बरेच काही तुम्ही लिहिलेले साहित्य .... . तसेच आपल्या छोट्या दोस्तांनी लिहिल्या गोष्टी, कविता, काढलेली चित्रे, हस्त-कलेचे, lego पासून बनवलेल्या creation ची क्षणचित्रे....

'अनुबंध' वाचनीय होण्यासाठी या आधी आपल्यातील अनेक लहान आणि मोठ्या मंडळींचा हातभार लागला आहे. तीच आशा घेऊन आम्ही पुढील अंक प्रकाशित करायचे ठरवले आहे. मग आपले साहित्य जरूर पाठवा आणि साहित्य पाठवण्यासाठी खालील नियम पाळा.

साहित्य पाठवण्यासाठी ई-मेल - Seema.kanitkar@nemm.org

नियम :

- आपल्या लिखाणास वयोमर्यादिचे बंधन नाही. (लहानांपासून आजी आजोबांपर्यंत कोणीही लिहू शकते!)
- तुमचे साहित्य मराठी किंवा इंग्लिश भाषेमध्ये .doc फाईल मध्ये पाठवायचे आहे.
- आपले लिखाण जर कथा, प्रवासवर्णन या प्रकारात मोडत असेल तर शब्द मर्यादा १२००, माहिती स्वरूपातील लेख साधारण शब्द मर्यादा ४५० इतकी असावी.
- आपले साहित्य लेखाचा विषय नोंद करा.
- उचित व दर्जेदार लेखनास/साहित्यास प्राधान्य देण्यात येईल.
- साहित्य व लिखाण मिळाल्यावर पोच ई-मेलने दिली जाईल.
- फोटो, कलाकृती, जाहिरात Jpeg format मध्ये पाठवावे.
- 'अनुबंध' बद्दल आपला अभिप्राय seema.kanitkar@nemm.org या ई-मेल आयडी वर जरूर कळवा.